

ब्रह्मतेजो बलंबलम्



हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४

६१

# मासिक नवस्नेह

वर्ष १२ वे : अंक २
मे २०२६




प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळा



रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर, कऱ्हाडे ब्राह्मण संघ आणि अखिल ब्राह्मण संस्थांच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी ७ वाजता कात्यायनी येथे जाऊन सर्व भक्तांनी श्री परशुरामाचे अभिषेक घालून पूजन केले. यामध्ये तिन्ही संस्थांचे पदाधिकारी हजर होते. यानंतर चित्पावन संघाच्या हॉलमध्ये श्री परशुराम मूर्तीला अभिषेक करून पूजन करण्यात आले. संध्याकाळी ५ वाजता भगवान श्री परशुराम यांची पालखी व शोभायात्रा काढण्यात आली. प्रसिद्ध सराफ श्री. चिपडे यांनी पालखीचे पूजन केले. शोभायात्रेत ब्राह्मण समाजाची एकजूट दिसून आली. यात्रा मार्ग पेटाळ्यावरून खरी कॉर्नर-शिवाजी पुतळा-निवृत्ती चौक-गांधी मैदान-महाराष्ट्र हायस्कूल रोड आणि परत पेटाळा मैदान असा होता. त्यानंतर सरबत वाटप झाले. ६.४५ वा. जन्मकाळ होऊन आरती झाली. नंतर श्री. इंद्रनील बंकापुरे यांचा 'मंदिराच्या देशा' हा दृक्श्राव्य कार्यक्रम घेण्यात आला. परंतु अचानक आलेल्या पावसामुळे कार्यक्रम थोडा वेळच होऊ शकला. नंतर महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर (मंगलधाम), कऱ्हाडे ब्राह्मण संघ व इतर ब्राह्मण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पुरुषोत्तम मासानिमित्ताने सामूहिक दाम्पत्य सोहळा

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम (अधिक) मासा निमित्ताने ३०+३ दाम्पत्य भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यानिमित्ताने आप्तजनांना दाम्पत्य भोजनाचा लाभ देऊन पुरुषोत्तम मासाची पुण्यप्राप्ती आपल्या सहभागाने करावी ही विनंती. सदर सोहळ्यात सहभागी होण्यासाठी यजमानांना **रु. ३०००+३०० (रुपये तीन हजार तीनशे फक्त)** इतके शुल्क द्यावे लागेल. यामध्ये तीन दाम्पत्यांच्या (६ व्यक्तींच्या) भोजनाचा तसेच दक्षिणा, सुवासिनींची ओटी आदि सर्व खर्च समाविष्ट आहे. आपणांस अधिक व्यक्ती निमंत्रित करावयाच्या असतील तर प्रति व्यक्ती रु.४००/- (रुपये चारशे फक्त) प्रमाणे अतिरिक्त खर्च येईल.

**आपले विनित, कोल्हापूर चित्पावन संघ.**

**स्थळ** खरे मंगल कार्यालय, सन्मित्र हौसिंग सोसायटी, शिवाजी विद्यापीठ रस्ता, कोल्हापूर.

**वेळ** शनिवार दि. २३ मे २०२६ (अधिक ज्येष्ठ शु. अष्टमी), रोजी सायंकाळी ५.०० वाजता विष्णू पूजन, आरती व प्रसाद - सायंकाळी ७.३० नंतर दाम्पत्य भोजन. **नोंदणीसाठी अंतिम तारीख - १५ मे २०२६.**

- **नोंदणी व संपर्क** : कोल्हापूर चित्पावन संघ, ७६२०५४६२२५, ०२३१- २५४६२२५.
- श्री. केदार जोशी (कार्यवाह) ७५८८८३९५२७ * श्री. संतोष साने (सह कार्यवाह) ८४५९०१९०९१

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १२ वे : अंक २ : मे २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **बर्म्युडा ट्रँगलचे रहस्य /५**
 – श्री. बाळासाहेब पाटोळे

३) **ताराबाई साठे /८**
 – वैदेही जोशी

४) **ज्ञानसूर्याची सावली /१०**
 – सौ. मंजुश्री गोखले

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३**
 – सौ. मंजुश्री गोखले

६) **मनाला खुपणारं कागदावर /१६**
 – कमला हर्डीकर

७) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /१९**
 – ओंकार गाडगीळ

८) **भारतरत्न नानाजी देशमुख/२१**
 – विकास मेहंदळे

९) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ९ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

कसा आहे उन्हाळा? सूर्य तळपतोय ना नुसता? अधनंमधनं पावसाची हूल मिळतीय, पण त्यामुळे उष्णता वाढतेच आहे. झालं पण आता ! आता मे महिनाच फक्त ! मग जून आला की हवा बदलती ! तोपर्यंत दिलासा द्यायला आपला नवस्नेह आहेच !

मित्रांनो, या महिन्याच्या नवस्नेहमध्ये आपल्या सगळ्यांना ज्याबद्दल अपार उत्सुकता आहे, त्या विषयावरचा लेख या अंकात आहे. तो विषय आहे 'बर्म्युडा ट्रँगल'! हा लेख लिहिणारे बाळासाहेब पाटोळे जहाजावरच नोकरीला आहेत आणि बर्म्युडा ट्रँगलबद्दलचा अत्यंत माहितीपूर्ण असा हा लेख त्यांनी लिहिलाय अगदी सखोल माहितीसह ! तुम्हाला नक्की आवडेल वाचायला. शिवाय आपली नेहमीची लोकप्रिय सदरे आहेतच.

मित्रांनो, आता जून महिन्यापासून नवस्नेहच्या दिवाळी अंकाचे काम सुरू होईल. तुमचा सहभाग असणार ना त्यात? मग उचला पेन आणि लिहा छानसं काहीतरी, आणि पाठवा आमच्याकडे ! तुमच्या लिखाणाचं स्वागतच आहे. लिखाणातून व्यक्त होणं यातही एक छान आनंद असतो बरं का ! आणि प्रत्येकाच्या आयुष्यातले अनुभव वेगवेगळे असतात आणि खूप सांगण्यासारखेही असतात. कारण खरं सांगू? आयुष्य प्रत्येक जणांना नीट कळतच नाही ! हे आयुष्य प्रत्येक वेळी एक वेगळा रंग दाखवतं !

**जिंदगी जब भी लगा की**
**मैंने तुझे पढ़ लिया ।**
**लेकिन न जाने क्यों तुने**
**तब एक पन्ना और खोल दिया ।।**

असंच तर आहे ना जीवन? अरे हो, यावेळी एप्रिल, मे च्या संपादकीयमध्ये आंब्याचा उल्लेख राहिलाच ! तेव्हा आता ती दुरुस्ती करते. उकाड्यानं हैराण करणाऱ्या या मे महिन्यात दिलासा देणाऱ्या दोन गोष्टी, एक म्हणजे नवस्नेह आणि दुसरी म्हणजे 'आंबा'! हां ! आता बरं वाटलं ! तुम्हाला पण ना? असो! पण आंबरस खाण्याच्या आनंदात दिवाळी अंकाचा विषय विसरू नका हं ! नाही ना विसरणार?

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# बर्म्युडा ट्रँगलचे रहस्य

**बर्म्युडा त्रिकोण (Bermuda's Triangle)**

Let's fly through the Mystery.....

आज आपण एका विचित्र आणि अद्भुत अश्या माहितीच्या सफरीवर जात आहोत. सीट बेल्ट अगदी करकचून बांधा आणि तयार व्हा. चला मग पहिला भूतकाळात जाऊ... भुर्रर्रर्र...

**पहिली घटना :** तारीख ५ डिसेंबर १९४५. नुकतंच दुसरं जागतिक महायुद्ध संपलंय पण अमेरिकन सैनिक आणि त्यांच्या तुकड्या आहेत तिथेच आपापल्या सैनिक स्थळावर राहून युद्ध सराव वगैरे करत आहेत. याचाच एक भाग म्हणून फ्लोरिडा एअर बेस वरून पाच युद्ध विमानांचा ताफा (ताफ्याचे नाव : फ्लाईट १९) सरावासाठी बाहेर निघतो. ही विमानं म्हणजे महायुद्धात ज्या विमानांनीं सर्वात जास्त विध्वंस करून अमेरिकेला विजयश्री प्राप्त करून दिली होती अशी ही हवेतून समुद्रात असणाऱ्या जहाजांवर तोरपेडो सोडणारी युद्ध विमाने. याच विमानांवर शिकाऊ पायलट सराव करत असत. त्यामुळे यातील बरेचसे वैमानिक हे शिकाऊ आहेत. बहामा बेटांवरती जाऊन पुन्हा परत असा एकूण तीन तासाचा हवाई प्रवास. नास्ता करून हे शिकाऊ पायलट आपली पाचही युद्ध विमाने उड्डाण करून हवेत सुसाट निघाली.

जवळपास १ तास आणि ३० मिनिटं झाल्यानंतर एक पायलट दुसऱ्या पायलटला विचारतो की मला वाटतंय आपण योग्य मार्गावर उड्डाण करत नाही आहोत कारण माझा कंपास (दिशादर्शक होकायंत्र) वेगळीच दिशा दाखवत आहे. दुसरा पायलट म्हणतो नाही, आपण योग्य मार्गावर आहोत.

कांही वेळात नियोजित वेळेनुसार समोर बहामा बेटं दिसायला हवी होती पण ती दिसत नाहीत म्हणून हे ताफ्याची दिशा बदलतात. या सर्व घटना ते पायलट आपल्या बेस स्टेशनला रेडिओवर कळवत राहतात. पायलट अचानक रिपोर्ट करतो की खाली समुद्राचे पाणी पूर्णतः पांढरे दिसत आहे, कांहीतरी गडबड आहे... नाही नाही पाणी पांढरे नव्हे हिरवे दिसत आहे.... एअर बेस कडून त्यांना पश्चिमेकडे म्हणजेच बेसकडे परत फिरण्याचे आदेश दिले जातात. पण इकडे पायलट फौजेला दिशा कांही केल्या कळेनात, ते त्यांना जसं सुचेल त्या दिशेकडे उड्डाण करत राहिले आणि असे जवळपास आणखी २ तास होत राहिले... आणि एकूण जवळपास साडे तीन तासाच्या उड्डाणानंतर आणि त्यातील २ तास एअर बेस च्या मार्गदर्शनानंतरही ती पाचही विमाने संपर्क क्षेत्राच्या बाहेर निघून गेली.

या अश्या संपर्क तुटण्याने एअर बेसवर इमर्जन्सी घोषित झाली आणि कांहीच वेळेत पाण्यावरून उड्डाण करून पाण्यात उतरू शकणारे विमान त्या गायब झालेल्या विमानांना शोधण्यासाठी बाहेर पडले. बेपत्ता विमानांच्या शेवटच्या संदेश रेकॉर्डनुसार त्यांची ठिकाणं शोधत शोधत त्या आपत्कालीन विमानाने शोधकार्य चालू केले. त्यात एकूण १३ सैनिक आणि मेडिकल ऑफ़ीसर असा स्टाफ होता. पुढील २ तास यांच्या शोधकार्याचे संदेश बेस स्टेशनवर येत होते. इकडूनही त्यांना योग्य दिशा कळवत मार्गदर्शन करण्यात येत होते आणि अचानक... या आपत्कालीन विमानाचाही संपर्क एकाएकी खंडित झाला तो पुन्हा प्रस्थापित होऊच शकला नाही.

आज अमेरिकन एअर फोर्सचे एकूण २७ लोक आणि एकूण ६ विमाने कोणत्याही आगाऊ सुचनेशिवाय किंवा कोणत्याही आप्तकालिन मेसेजशिवाय गायब झाली होती !

**दुसरी घटना :** १ फेब्रुवारी १९६३... टेक्सास बंदर... जहाजांनी खचाखच भरलेले पोर्ट... सगळीकडे लगबग चाललीय... त्यात मरिनसल्फरक्वीन नावाचे जहाज कार्गो लोड करून व्हर्जिनियासाठी निघायच्या बेतात आहे. जहाजात एकूण ३९ नाविक कर्मचारी... जहाजाने भोंगा वाजवला आणि जहाज आपल्या गंतव्य ठिकाणासाठी निघाले.

तीन दिवस झाल्यानंतर म्हणजेच ४ फेब्रुवारी १९६३ रोजी जहाज बरमुडा बेटाच्या पुढे पोचले असता, नित्य नेमाप्रमाणे जहाजाने सकाळी आपल्या कंपनीला दररोजचा रिपोर्ट पाठवला. आणि दुर्दैवाने तोच त्यांचा शेवटचा मेसेज ठरला. त्यानंतर त्या जहाजाचा कोणताही अवशेष किंवा इतर कांहीही सापडले नाही.

वरील दोन्ही घटना या ज्या समुद्राच्या भागात घडल्या तो भाग म्हणजे अटलांटिक महासमुद्राचा भाग आहे.

१९४५ आधी बर्म्युडा त्रिकोण असं नाव असणारी कोणतीही जागा अस्तित्वात नव्हती. पण अमेरिकेच्या त्या दुर्दैवी घटनेनंतर या जागेविषयी त्याकाळी सर्वच वर्तमानपत्रात बराच काळ चर्चा होत राहिली आणि त्यानंतर या जागेला बर्म्युडा त्रिकोण (Bermuda Triangle) तर कांही लोकांनी याच जागेला सैतानाचा त्रिकोण (Devils Triangle) असेही नामकरण केले.

फ्लोरिडापासून पोर्तो रिको आणि तिथून पुढे उत्तरेकडे बरमुडा बेट आणि बरमुडापासून पुन्हा पश्चिमेकडे फ्लोरिडापर्यंत असा हा भाग, यालाच बरमुडा त्रिकोण असं समजले जाते. हा भाग किती स्क्वेअर किलोमीटरचा आहे याबद्दल बरीच मतमतांतरे आहेत. पण अगदी १३ लाख ते ३८ लाख स्क्वेअर किलोमीटर पर्यंत याची व्याप्ती असावी असं मानलं जातं.

चला जाणून घेऊ या जागेविषयी अजून सविस्तर अशी भौगोलिक आणि शास्त्रीय माहिती....

१) वरती सांगितल्याप्रमाणे ही त्रिकोणी जागा फ्लोरिडा समुद्री तटावर येते. त्या तटावर गल्फ ऑफ मेक्सिको इथून एक नैसर्गिक असा समुद्री प्रवाह वाहतो आणि असे समुद्री प्रवाह वाहत राहणे हे अनादी काळापासून चालू असते आणि खरंतर यामुळेच पृथ्वीवरच्या तापमानाचे चक्र सुरळीत राहण्याची क्रिया घडत असते आणि या प्रवाहांमुळेच समुद्राचे पूर्ण पाणी दर पाच वर्षांनी असे एक चक्र पूर्ण करते आणि हे समुद्री पाणी पूर्णतः आपली जागा बदलते.

तर असा हा बऱ्याच प्रवाहापैकी एक असा हा गल्फ ऑफ मेक्सिकोचा प्रवाह आहे तो पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत या अटलांटिक महासमुद्रात बर्म्युडा त्रिकोणाच्या भागात मिसळतो आणि विशेष म्हणजे त्या प्रवाहाचा वेग जगातील इतर सर्व समुद्री प्रवाहापेक्षा अतिजास्त गतिशील आहे.

२) अटलांटिक महासमुद्रामध्ये दरवर्षी सरासरी ५ मोठी चक्री वादळे येतात आणि विशेष म्हणजे त्यांचे उगमस्थान हे नेहमीच या बर्म्युडा त्रिकोणातच असते. चक्री वादळ म्हणजे मग ढग आणि विजांचा लखलखाट हा ओघानेच आला.

३) इथं समुद्री वातावरण या चक्री वादळामुळे सहसा विस्कटलेलेच असते, त्यामुळे मोठाल्या लाटा या अचानकपणे कधीही तयार होतात.

४) अटलांटिक महासागराचा समुद्रतळ हा पर्वतशृंखला आणि अफाट खोल अश्या दऱ्यांनी बनलेला आहे, आणि विशेष म्हणजे या पर्वतराजी कठीण पाषाणाच्या नसून त्या कधीही भूस्खलन होणाऱ्या अश्या मातीच्या बनलेल्या आहेत आणि असे भूस्खलन ही नित्याचीच बाब आहे.

५) या पूर्ण भागात समुद्र तळाखाली नैसर्गिक वायूचे (Natural Gas) नैसर्गिक असे अफाट साठे आहेत. हा गॅस इतक्या प्रमाणात आहे की जर हा गॅस व्यवस्थितपणे काढून वापरण्यास चालू केला तर अमेरिकेला पुढील ७० वर्षे इतर पेट्रोलियम पदार्थांची गरज भासणार नाही.

आता या भौगोलिक महितीनंतर आपण पाहू याचा जहाज आणि विमाने गायब होण्याशी काय संबंध?

मी जे आता सांगणार आहे त्यासाठी याआधी जी माहिती वाचली आहात ती व्यवस्थित लक्षात ठेवा म्हणजे पुढील मुद्दे समजण्यास मदत होईल.

**घटना क्रमांक एक :** १९४५ साली गायब झालेली अमेरिकन एअर फोर्सची ६ विमाने, याबदल एका संशोधन करणाऱ्या एका टीमने काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे.

त्या शिकाऊ पायलट सैनिकांना भर समुद्रात पांढरे पाणी दिसत होते ते म्हणजे त्यावेळी समुद्र तळाखाली असलेल्या नैसर्गिक वायूची साठा असणारी जागा अंतर्गत लाटांमुळे अचानक खुली होऊन नैसर्गिक वायूचे प्रचंड प्रमाणात बुडबुडे तयार झाले. अश्या तयार झालेल्या बुडबुड्यांमुळे पाणी पांढरे दिसणे साहजिक आहे. आता यापुढील महत्वाचा मुद्दा म्हणजे हा नैसर्गिक वायू समुद्र तळातून बुडबुड्यांच्या स्वरूपात बाहेर पडून पाण्याच्या वर वातावरणात हवेत मिसळला.

या नैसर्गिक वायूचे एक वैशिष्ट्य म्हणजे हा गॅस गंध आणि रंग विरहित असतो. आम्ही जहाजातून जो गॅस द्रव रुपात वहन करतो तो हाच गॅस ज्याला आम्ही LNG म्हणजे Liquified Natural Gas म्हणतो आणि आपण

लोक याच वायुरूपातील गॅसला CNG म्हणता. सामान्य गिऱ्हाईकापर्यंत हा गॅस पोचवताना त्यात मुद्दाम असा उग्र वासयुक्त पदार्थ मिसळला जातो ज्यामुळे हा गॅस लिकेज झाल्यास कोणालाही वासाने कळावे आणि अपघात टाळता यावा हा यामागचा मुख्य हेतू असतो.

दुर्दैवाने असे कांहीही त्या पायलट लोकांना कळणे शक्य नव्हते. खाली फेसाळलेले पांढरे पाणी बघून घाबरलेले पायलट आणि अश्यात वातावरणात मिसळलेला नैसर्गिक गॅस विमानाच्या इंजिन मध्ये हवे सोबत घुसतो आणि ती इंजिन हवेच्या म्हणजेच ऑक्सिजन च्या अभावाने हवेत असतानाच जागच्या जागी बंद पडतात. आणि मग अश्या इंजिन बंद अवस्थेतील विमान कोसळणे हे स्वाभाविक आहे.

हे सगळं प्रकाशित करण्याआधी या टीम ने एक प्रयोग म्हणून अश्याच बनावटीचे विमान आणून इंजिन चालू करून त्याला नैसर्गिक वायू हवेतून देण्यात आला तर ते इंजिन ताबडतोब बंद झाले आणि यातील विशेष बाब म्हणजे हवेतून फक्त एक टक्का नैसर्गिक वायू दिल्याने इंजिन बंद पडले हे त्यांनी अनेकवेळा प्रयोग करून पाहिले आणि मगच हा रिपोर्ट त्यांनी प्रकाशित केला.

याच टीमने १९६३ साली इथंच गायब झालेल्या जहाजाबद्दल ही असेच दोन प्रयोग केले.

आपण वरती वाचल्याप्रमाणे येथील समुद्र तळाला प्रचंड प्रमाणात पर्वतराजी आणि त्याखाली नैसर्गिक वायूचे साठे आहेत.

कधी कधी अश्या जमिनीतून अचानक गॅस चे प्रचंड प्रमाणात बुडबुडे निघायला चालू होतात. आणि हे बुडबुडे त्या भागात पाण्यात मिसळून वरती यायला चालू होतात. यासाठी आपण सोडा बॉटल मधील गॅस युक्त पाणि आठवून पहा, नेमकी तीच अवस्था इथं समुद्रात झालेली असते. आता यामुळे होते काय की पाण्याची घनता प्रचंड प्रमाणात घटते आणि पाण्याची एखादी वस्तू पाण्यात तरंगवत ठेवण्याची क्षमता (Buoyancy) अगदीच कमी होते आणि मग या पट्ट्यात येणारी कोणतीही वस्तू बुडण्यापासून वाचणे अशक्य होऊन जाते.

याचाच दुसरा प्रयोग म्हणजे समजा ज्यावेळी समुद्र तळावरील पर्वतराजी मध्ये भूस्खलन झाले तर या अचानक झालेल्या बदलामुळे समुद्राच्या पाण्याच्या स्थिरतेवर परीणाम होतो आणि सुनामी सदृश्य परिस्थिती तयार होते आणि यातून मग जहाज सुटणे शक्य नसते.

याचाच पुढील भाग म्हणजे या भुसाखलनामुळे जर नैसर्गिक वायूच्या साठ्याचे एखादं दुसरे मोठे तोंड जर उघडले गेले तर समुद्र तळाशी एखादा स्फोट झाल्यासारखे समुद्रातून पाणी वर फेकले जाते आणि तेथील गॅस पूर्णतः बाहेर पडेपर्यंत त्या जागी पाण्यात एक वेगळीच पोकळी तयार होते त्यात जर जहाज गेले तर ते पाण्यातून अचानक एखाद्या धबधब्यावरून खाली कोसळल्यासारखे खाली कोसळते. हा प्रयोग त्यांनी लॅब मध्ये करून पाहूनच त्याबद्दल निष्कर्ष जाहीर केले आहेत.

वरील सर्व बाबींमध्ये एक गोष्ट कॉमन आहे आणि ती म्हणजे हे सर्व इतके अचानक घडते की जहाज किंवा विमान यांना आपल्या स्टेशनला किंवा जवळच्या जहाजांना मदतीसाठी किंवा आपण अडचणीत असल्याचा एखादा मेसेज ही पाठवायला वेळही मिळत नाही.

यातील महत्वाचा राहिलेला मुद्दा म्हणजे गरागरा फिरणारे दिशादर्शक होकायंत्र... याबद्दल संशोधक इतकंच म्हणतायत की तिथं कांही विचित्र असे चुंबकीय बल आहे त्यामुळे अश्या घटना घडतात आणि हे असे चुंबकीय बदल कशामुळे झालेत याबद्दल आजही संशोधन चालूच आहे.

एक अतिमहत्वाचा मुद्दा राहिलाय आणि तो म्हणजे ही सर्व बुडालेली जहाजे आणि विमान यांचा सांगाडा किंवा एखादा पार्ट ही आजतागायत कुठंही सापडला नाहीय. आजच्या या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात अद्ययावत यंत्र सामुग्री वापरूनही समुद्री तळाशी यांचा शोध घेण्यात आला पण आजतागायत एकही वस्तू किंवा तुकडा हाती आलेला नाहीय.

याबद्दल एक थेअरी अशीही आहे की गल्फ ऑफ मेक्सिको येथून अतिजलद वाहणाऱ्या प्रवाहाने असे तरंगणारे भाग किंवा सुट्टे पार्ट अतिवेगाने महासमुद्रात वाहून नेले असावेत.

जर हे ग्राह्य धरले तर... जहाजाचा अतिजड आणि न तरंगणारा असा सांगाडा आणि विमानाचे इंजिन

**पान २० वर पहा...**

# ताराबाई साठे

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेताना पुढच्या आयुष्याचा, भविष्याचा विचार कुठल्याही स्वातंत्र्य सैनिकाने केला नव्हता. त्यांच्या मनात स्वार्थ नव्हता,कुटुंबातील लोकांच्याबद्दल स्वप्न रंगवली नाहीत..देशभक्तीने भारावल्या मनानी आपले आयुष्य वेचण्याचा निर्धार... इतकाच हेतू प्रांजळ होता. अशा हेतूने प्रभावित झालेल्या अनेक कुटुंबांनी आपल्या मुलांवरही संस्कार तसेच केले... त्यामुळेच स्वातंत्र्य लढ्यातील अनेक स्त्रियांचे योगदान हे अनन्य साधारण आहे..अशीच एक भगिनी म्हणजे ताराबाई साठे...!!

२ एप्रिल १९१३ साली भाऊ महाराजांच्या बोळात रानड्यांच्या वाड्यात जन्माला आलेली तारा ही एक लोभसवाणी, गोरी गोमटी, अत्यंत देखणी बालिका होती. निसर्गाने दिलेल्या अभूतपूर्व सौंदर्यानी नटलेल्या या बालिकेला सर्वजण तारा म्हणूनच ओळखत... तारावतीवर साऱ्या घरातील लोकांचा विलक्षण जीव होता. बागडणारी तारा केवळ भाऊ महाराजांच्या बोळातच नव्हे तर त्या सर्व भागात सर्वांची लाडकी झाली होती. निसर्गाने तिला केवळ रूपसंपदाच दिली नव्हती तर बुध्दिमत्तेची प्रचंड प्रमाणात उधळणही तिच्यावर केली होती. महाभारतामधील गोष्टी ऐकता ऐकता तारा गोष्टी सांगणाऱ्यांना प्रश्न विचारून भंडावून सोडीत असे. बुध्दिमान तारा दुर्योधनाला सुयोधन असे का म्हणत नव्हते? धर्म म्हणजे काय? अशा प्रश्नांनी स्वतःला आणि मोठ्या लोकांनाही विचार करायला प्रवृत्त करत असे. सनातनी वातावरण जरी घरात असले तरी ते कर्मठ विचारांचे नव्हते.

निसर्ग आणि नियती यांची खेळी मानवाला कधीच कळत नाही. म्हणूनच अशा या बुध्दिमान मुलीला बालवयातच एका भयानक रोगाने घेरले.. घरात हाहाःकार उडाला. हकिम, वैद्य, डॉक्टर इत्यादीनी या नव्या रोगापुढे हात टेकले. सारे हवालदिल झाले. पण घाबरली नाही ती फक्त तारा. त्या लहान वयातही ती म्हणायची, 'मी जगणार आहे. मला मोठे व्हायचे आहे' आणि या आत्मविश्वासाने तिने घातकी रोगावर मात केली. खडखडीत बरी झाली. सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. एका दुर्मीळ असाध्य रोगाबरोबर झुंज देणाऱ्या ताराला एक नवी दिशा मिळाली. एक नवा विचार, नवी जिद्द तिच्या मनात अंकुरली आणि वाढत्या वयाबरोबर तिच्यामधील दुर्मीळ गुण विकसित होत गेले.

पुनर्जन्म झालेल्या ताराबाईने केवळ शालेय अभ्यास करू नये इतर विषय व कलांमधेही प्रावीण्य मिळवावे असे घरातील वडिलधाऱ्या माणसांबरोबर स्वतः तारालाही वाटत होतं... त्याप्रमाणे ती संगीत आराधना करून दिलरुबासारखे वाद्य वाजविण्यात निपुण बनली. याच्यासोबतच प्रवचन कीर्तन करण्यास सुरुवात केली. यातही तारा प्रामुख्याने स्त्री जागृती..या विषयावर बोलायची..त्या काळातील स्त्री जीवन संघर्ष अन् स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचा सहभाग तिच्यासाठी प्रेरणादायी बने.

ताराने समाजसेवेबरोबर भारत स्काऊटस आणि गाईडस, अखिल भारतीय महिला परिषद या संस्थेच्या कामातही सहभाग घेतला. यातही ताराने प्रगत विचाराने आणि अखंड सेवावृत्तीने कामास सुरुवात केली. पुणा वुमेन्स कौन्सिल, कस्तुरबा ट्रस्ट, ग्रामोद्योग अशा अनेक पातळींवरच्या कार्याला कर्मभूमी मानून कार्य केले. विधायक पदाची, आर्थिक लाभाची, पैशांची अपेक्षाही न करता त्या सातत्याने समाजकार्याशी एकरूप झाल्या. गांधीजींच्या विचाराने त्या पूर्णतः भारावून गेल्या. गांधीजींनी सुरू केलेल्या लढ्यात पूर्णतः झोकून दिले. अत्यंत नाजूक शरीरयष्टी आणि प्रकृती असतानाही गांधीजीचे विचार, काम, राष्ट्रासाठी त्यानी सुरू केलेले विविध प्रयोग खेड्यापाड्यापर्यंत पोहचवण्यासाठी मिळेल तेथे थोडीशी विश्रांती घेऊन

आणि पुन्हा हसतमुखाने काम करण्यासाठी त्या १२-१२ तास प्रवास करून दूर-दूरच्या खेड्यात जात असत. लोकांशी संवाद साधीत. त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत. कोणत्याही कामाची आखणी करून ते काम सुसूत्र पध्दतीने करण्याची हातोटी त्यांच्या रक्तातच भिनली असल्यामुळे कामांचे डोंगर, नव्हे पर्वतच त्या पार करत. वक्तशीरपणामुळे व जिद्दीने हे सर्व करीत असतानाच त्यांची लेखणीही कार्यरत असे. ज्याचा अभ्यास करावयाचा त्यासंबंधी सखोल वाचन करणे, त्या संबंधी स्वतःच प्रश्न उपस्थित करून स्वतःचे समाधान होईपर्यंत लेखणीला लिहिण्यासाठी परवानगी न देणे ही त्यांची लिखाणाची पद्धत!! त्यांची स्मरणशक्तीही प्रचंड होती. एकदा पाहिलेली व्यक्ती, प्रसंग, ठिकाण त्या कधीच विसरत नसत. अत्यंत साधी राहणी, सर्व तऱ्हेची अनुकूलता असतानाही त्याचे प्रदर्शन न करणे, दुसऱ्यांना उत्तेजन देऊन काम करण्यास प्रवृत्त करणे, त्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करणे हे त्यांचे आगळेच वैशिष्ट्य होते. मैत्रिणींना अडचणीच्या प्रसंगी धीर देऊन अडचणीवर मात करण्याचे धैर्य त्यांच्यात निर्माण होणे. दुसऱ्यांच्या सुख दुःखाशी समरस होणे, प्रसंगी गरजेप्रमाणे मदत करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे, सतत उद्योगात असणे हेही त्यांचे विशेष होते.

त्या नेहमी काही ना काही लिहित असत. कोणाला कोणते काम सांगितले असता ते त्याला साधेल याचा अंदाज करून प्रत्येकाची गुणवत्ता व कुवत पाहून त्यांच्याकडून काम करून घेण्याचे कसब त्यांच्यात होते. टापटीप व शिस्त हा त्यांचा खास गूण... गबाळग्रंथी कारभार त्यांना केव्हाच मान्य नसे. अशा ह्या ताराबाईनी राज्यसभेला कठोर निपक्षपातीपणा दर्शवून दिला. राजधानीत राहूनही त्या देशासंबंधीची आपली कर्तव्ये कधी विसरल्या नाहीत. साक्षरता प्रसार, ग्रंथालये, ए.आर.पी, पर्सडेर सिव्हिल डिफेन्स मॉंटेसरी यांसारखे छोटे मोठे अभ्यासक्रमामध्ये त्यांनी प्रावीण्य मिळवले. या सर्व गोष्टीबरोबर त्यांची लेखणीही सतत कार्यरत असे. अपराजिता रमा या नावाने त्यानी पंडिता रमाबाई सरस्वती यांचे रोचक चरित्र लिहिले. या पुस्तकात समाज परिवर्तनाचा खास संदर्भ आहे. 'संसद' हे पुस्तक एक अभ्यास ग्रंथ म्हणून प्रसिध्द आहे. त्यामध्ये आपल्याला पार्लमेंटच्या कामकाजाची संपूर्ण माहिती समजते. तिसरे पुस्तक त्यांनी खादी या विषयावर लिहिले. खादीचे अर्थशास्त्र व भूमिका त्यानी समाजापुढे यथार्थ रितीने मांडली. अशी ही कर्तव्यदक्ष, ज्ञानी, सेवाभावी तारा!! कस्तुरबा ट्रस्ट हे त्यांचे सेवेचे आणखी एक दालन.

अशा या ताराबाई प्रत्येक चळवळीत प्रत्येक लढ्यामध्ये अग्रेसर होत्या. त्यांचे संघटना चातुर्य अलौकिक आणि आदर्श होते. ताराबाईंच्यामुळे केवळ स्त्री जगताची नव्हे तर भारताची उच्च परंपरा उंचावली.अशा कणखर अन् निश्चयी स्त्री शक्तीला मनःपूर्वक अभिवादन!!

**- वैदेही जोशी,**
मोबा. ९५४५६३५४६५

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक एकोणचाळिसावा)

चौघांची नावं ऐकून कुणीतरी खवचटपणे म्हणालं, ''वा, वा! काय पण त्या संसारी संन्याशानं मुलांची नावं ठेवली आहेत! मोठा पुण्यवानच लागून गेला की नाही? कृती सगळी अधर्माची आणि मुलांची नावं ही अशी! वा! वा! तू कोण हं! सोपान नाही का? हं! काय रे? काय म्हणून तुझ्या आई–बापानं तुमची ही अशी नावं ठेवलीत? तुला तरी सांगता येईल का?'' विचारणाऱ्याच्या स्वरात हेटाळणी, उपहास काठोकाठ भरला होता. आपलं नाव घेतलेलं बघून सोपान पुढे झाला. हात जोडून प्रणाम करून म्हणाला, ''भूदेव, आचार्य, आपली अनुमती असेल, तर मी या भूदेवांच्या शंकेचं निरसन करू का?'' आचार्यांनी मानेनंच संमती दिली. सोपान पुढे झाला, हात जोडून म्हणाला, ''भूदेव, माझ्या आई–वडिलांनी आम्हा भावंडांची ही नावं ठेवलीत, त्याची संगती सांगण्याचा मी प्रयत्न करतो. माझे गुरु व ज्येष्ठ बंधू निवृत्तीदादा यांना प्रणाम करून मी सुरुवात करतो. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता. यांची सुसंगती अशी आहे की, भौतिक संसारातून निवृत्ती घेऊन पारमार्थिक ज्ञान प्राप्त केलं की, अध्यात्माचा सोपान चढून गेल्यावर मनुष्यप्राणी मुक्त होतो. याची ही प्रतिनिधीक संज्ञा आहे भूदेव!'' सोपानानं केलेलं विश्लेषण ऐकून सारी धर्मसभा चकित झाली; पण अजून त्यांच्यातली कट्टरता गेली नव्हती.

पुन्हा एकानं विचारलं, ''काय रे पोरट्यांनो, काय म्हणून या धर्मसभेनं तुमचा न्याय करावा? याचं कारण देऊ शकतोस का?'' आता ज्ञानेश्वर पुढे झाला. हात जोडून उभा राहिला, म्हणाला, ''आचार्य धर्म हा मानवकल्याणार्थ आहे आणि तो ईश्वर सर्व चराचरांत भरून राहिला आहे. तसाच तो मनुष्यप्राण्यातही आहे. या मनुष्यस्थित ईश्वराच्या अधिष्ठानासाठी तरी आम्हाला न्याय द्या.'' ज्ञानेश्वराचं अस्खलित संभाषण साऱ्या धर्मसभेला विचार करायला लावणारं होतं; पण तरीही तिथं अजून काही विकृत विचारांचे धर्ममार्तंड होतेच. तिथून एक पाणीवाला आपल्या रेड्यावर पखाली बांधून चालला होता. त्याला हाकारून त्या धर्ममार्तंडांनी त्याच्या रेड्याचं नाव विचारलं. त्याने 'ज्ञाना' असं सांगताच सगळी कुत्सितपणानं हसली. पुन्हा त्यांनी ज्ञानेशाला डिवचलं आणि त्यानंतर जे घडलं ते न भूतो न भविष्यती असं होतं !

रेड्याच्या पाठीवर आसूड मारले, तर त्याचे व्रण ज्ञानेशाच्या पाठीवर उठले आणि त्यानं रेड्याच्या मस्तकावर हात ठेवताच तो रेडा वेदोच्चार करू लागला ! मग मात्र धर्मसभेची मती गुंग झाली. त्या एका घटनेनं सारं चित्रच बदललं ! ज्ञानेश्वर आणि त्याच्या तीन भावंडांची योग्यता किती मोठी आहे, हे सगळ्यांना समजून चुकलं ! जी धर्मसभा या भावंडांची हेटाळणी करत होती, तीच धर्मसभा या चौघांच्या पायांशी झुकली. संन्याशाची पोरं ही तिरस्काराची संज्ञा बाजूला पडली आणि निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर माउली, सोपानदेव आणि मुक्ताई अशी आदराची, प्रेमाची, भक्तिपूर्ण नावं धर्मसभेनं मोठ्या आदरानं उच्चारली आणि अत्यंत भक्तिभावनेनं या चौघांसाठी शुद्धिपत्र देण्याचे नक्की केलं !

पुन्हा सगळे मामाआजोबांच्या घरी आले. मामीआजीनं सगळ्यांची दृष्ट काढली. दोघांनी सगळ्यांना जवळ घेतलं. मामीआजीच्या कुशीत विसावलेला ज्ञानादादा हळूच जवळ असणाऱ्या सोपानाला म्हणाला, ''सोपाना, विपरीत घडलेलं सावरण्यासाठी अघटित घडवावं लागलं आणि या अघटितानं आणखी एक अघटित घडवलं. आता तरी

लोक आपल्याला आपलं म्हणतील ना?'' सोपानानं होकारार्थी मान हलवली आणि पुढे म्हणाला, ''दादा, झाडाला चांगली फळं-फुलं येण्यासाठी काय करावं लागतं? त्या झाडाला वेळोवेळी पाणी घालावं लागतं. तसंच या लोकांना पूर्ण शहाणं करायचं असेल, तर त्यांना अधनंमधनं असे धक्के द्यावे लागतील अजून!'' ज्ञानादादा काही बोलणार, तोच ''काय रे काय कुजबुजता आहात आपसात?'' असं मामीआजीनं विचारलं आणि ''काही नाही गं, भूक लागलीय असं म्हणत होतो!'' असे सांगून ज्ञानादादानं तो विषय तिथेच संपवला.

दुसरे दिवशी मोठ्या आदरानं आणि पूज्य भावनेनं पैठणच्या धर्मसभेनं आचार्य बोपदेवांच्या नेतृत्वाखाली एक शुद्धिपत्र तयार करून ते निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता यांना सुपूर्द केलं. त्या वेळी चौघांच्याही आनंदाला पारावार राहिला नाही. यानंतर पैठणवासीयांच्या आग्रहावरून ज्ञानादादानं तिथं प्रवचन, संकीर्तन केलं. त्यानंतर चौघांचा परतीचा प्रवास सुरू झाला; पण हा प्रवास येतानाच्या प्रवासासारखा कठीण, खडतर नव्हता, तर या चौघांची आणि विशेषतः ज्ञानादादाची कीर्ती सगळीकडे पसरली होती. त्यामुळे लोकांचे प्रेम, श्रद्धा, आग्रह, आदरातिथ्य काय असतं, याचा पदोपदी प्रत्यय त्यांना येत होता. वाटेतही एक-दोन ठिकाणी ज्ञानादादाला असे अघटिताचे साक्षात्कार लोकांना दाखवावे लागले. त्यात नेवाशातले सच्चिदानंद कुलकर्णी या मृत व्यक्तीला जिवंत केलं, वेद म्हणणाऱ्या रेड्यानं वाटेत आळेगावी प्राण सोडला, त्याला मुक्ती दिली. ज्ञानादादाच्या या योगसामर्थ्याची, तो घडवत असलेल्या साक्षात्काराची कीर्ती चहूकडे पसरत गेली आणि समाजाचा या चार भावंडांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला; पण एक गोष्ट मात्र झाली. समाज जसजसा या भावंडांजवळ यायला लागला, तसतसा सोपान मात्र अंतर्मुख होत गेला. त्याचं स्वतःच्या मनाशीच द्वंद्व सुरू झालं. सगळी जण पुन्हा आळंदीला परतली. इथंही त्यांचं भक्तीनं स्वागत झालं. आळंदीला आल्यावर त्यांचा पूर्वीचा दिनक्रम सुरू झाला, फक्त दोन गोष्टींत बदल झाला होता. एक म्हणजे माधुकरीची झोळी सुटली होती. आता माधुकरी मागायला जावं लागत नव्हतं. शेराशेरानं धान्य, शिधा सगळं झोपडीत येऊन पडत होतं. इतकं की, वाटून टाकायला लागत होतं आणि दुसरा बदल असा, की संध्याकाळचा वेळ लोकांसाठी, त्यांना प्रबोधन करण्यासाठी, कीर्तन-प्रवचन करण्यासाठी ठेवावा लागत होता. एकीकडे अध्ययन चाललं होतं, तर त्याच वेळी समाजाचं, लोकांचं प्रबोधनही चाललं होतं. त्यातच विसोबासारखा एखादा खोडसाळ गृहस्थ ज्ञानादादानं पाठीवर मांडे भाजलेले बघून शरण येत होता. लोकांच्या मनांतला भक्तिभाव, आदर वाढतच होता. सोपान मात्र आता अधिकाधिक अंतर्मुख होत होता. त्याचा स्वतःचा स्वतःशीच संवाद अधिक चालायचा. निवृत्तीदादाबरोबर त्याची ज्ञानसाधना सुरूच होती; पण पैठणच्या धर्मसभेत ज्ञानादादानं रेड्यामुखी वेद वदवल्यानंतर त्याची ज्ञानादादाकडे बघण्याची दृष्टीही बदलली. रेड्यामुखी वेद वदवणं, म्हणजे अंतर्गत ऊर्जेला एकवटून तिचा परकाया प्रवेश करायचा, हे हटयोगाचं सामर्थ्य आहे, हे सोपान जाणून होता; पण त्या दिवशी त्या ठिकाणी त्याला जे दिसलं, ते केवळ अभूतपूर्व असंच होतं. क्षणोक्षणी सोपानाला तो प्रसंग आठवत होता. आताही तो वेदाध्ययनाला बसल्यावर सोपानाला तो प्रसंग अगदी जसाच्या तसा आठवला.

रेड्याच्या पाठीवर आसूड ओढल्यावर ज्ञानादादाच्या पाठीवर वळ उठले. तरीही त्या कुत्सितांचं समाधान झालं नाही. त्यांनी पुन्हा ज्ञानादादाला डिवचलं आणि विचारलं, ''तुझं नावही ज्ञानेश्वर आहे. या रेड्याचं नावही ज्ञाना आहे. तू वेद-शास्त्र-पुराणं जाणतोस असं तुझं म्हणणं आहे. मग तुला जर वेद येतात, तर ते या रेड्यालाही आले पाहिजेत. कारण ईश्वर सर्व प्राणिमात्रांत आहे, असा तुझा दावा आहे ना? मग तुझ्यात जो ईश्वराचा अंश

आहे, तोच या रेड्यातही असला पाहिजे, म्हणजे तुला जे येतंय, ते या रेड्यालाही आलं पाहिजे. म्हणजेच तुला वेद येतात, मग या रेड्यालाही आले पाहिजेत. तू वेद म्हणतोस, ते वेद या रेड्यानंही म्हटले पाहिजेत. मग सांग बघू त्याला वेद म्हणायला.'' कुत्सित लोकांचं ते बोलणं या सगळ्यांच्याच जिव्हारी लागलं. सोपाना सचिंत झाला. मुक्ताच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. शांत होता तो निवृत्तीदादा. आणि ज्ञानादादा? तो तर प्रसन्नचित्तच होता. त्यानं एकवार व्यासपीठाकडे पाहिलं. आचार्यांना प्रणाम केला. या शंका काढणाऱ्यांकडे बघून 'आज्ञा भूदेव' म्हणत वंदन केलं आणि त्यानं निवृत्तीदादाकडे नजरेनंच अनुमती मागितली. निवृत्तीदादानं ती नजरेनंच दिली. ज्ञानादादानं सोपानाकडे पाहिलं. 'हीच ती योग्य वेळ' असं जणू सोपानाची नजर त्याला सुचवत होती. दोघांच्याही चेहऱ्यांवर स्मित उमटलं. ज्ञानादादा पुढे झाला. त्यानं हात जोडले. दीर्घ श्वास घेतला. आपल्या शरीरातली सगळी ऊर्जा एकवटली आणि त्यानं त्या रेड्याच्या मस्तकावर हात ठेवला. एक क्षण... एक क्षण सगळीकडे नीरव शांतता पसरली. इतकी, की एकमेकांचे श्वास एकमेकांना ऐकू यायला लागले आणि दुसऱ्या क्षणी.. दुसऱ्या क्षणी पहिल्यांदा ज्ञानादादाचा कोवळा, पण खणखणीत स्वर आणि पाठोपाठ रेड्याचा खर्जातला, खरखरीत स्वर त्या धर्मसभेत उमटला.

**ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्।**
**होतारम् रत्नधातमम्।।**
**अग्निः पूर्वेभित्रऋषिभिरीडयो नूतनैरुत।**
**स देवां एह वक्षति।।**

ज्ञानादादा आणि तो रेडा दोघंही वेद म्हणत होते. सोपानाचे डोळे अश्रूंनी भरले होते आणि त्याच्या अश्रूभरल्या डोळ्यांना ते दिसले. सोपानानं डोळ्यांतलं पाणी पुसलं आणि आपल्याला जे दृश्य दिसतंय तो आभास नव्हता, हे त्याला कळलं.

त्या धर्मसभेत त्या रेड्याच्या मस्तकावर हात ठेवून खरंतर ज्ञानादादा उभा होता; पण सोपानाला त्या ठिकाणी दिसला होता शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण केलेला श्रीविष्णू, त्याच्या हातातलं सुदर्शन चक्र फिरत होतं, तर त्याच्या चेहऱ्याभोवती तेजाची प्रभावळ होती. चेहऱ्यावर प्रसन्न हास्य होतं, तर डोळ्यांत शांत स्निग्ध भाव !

सोपाना डोळे विस्फारून ते दृश्य बघत राहिला. कधी सोपानाला तिथं त्याचा ज्ञानादादा दिसायचा, तर कधी भगवान विष्णू. मागे एकदा जंगलात त्याला निवृत्तीदादाच्या ठिकाणी भगवान शिवाचं दर्शन झालं होतं आणि आता ज्ञानादादाच्या जागी भगवान विष्णू! सोपानाचे अंगांग थरारलं ! ईश्वर भक्तीनं भारलेलं मन बंधूप्रेमानं भरून गेलं आणि त्यानं एक धावती नजर मुक्ताकडे टाकली. तिलाही तेच दिसत असावं. तिच्याही डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहत होते. सोपानाचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येत होते. डोळ्यांतलं पाणी पुसलं, की भगवान श्रीविष्णू दिसायचे आणि डोळे पाण्यानं भरले, की विष्णू पुसट होऊन तिथं त्याचा ज्ञानादादा दिसायचा. वेदातल्या काही ऋचा म्हणून झाल्या. ज्ञानादादा शांत झाला. रेड्याचाही आवाज थांबला. सगळी सभा चकित झाली होती. सुन्न झाली होती आणि त्यानंतर जे घडलं, ते अलौकिक होतं ! अभूतपूर्व होतं ! जो तो ज्ञानादादाचे पाय धरण्यासाठी धडपडत होता ! त्याच्या समोर लोटांगण घालत होता ! अर्थात सोपान-मुक्ता- निवृत्तीदादानं जे पाहिलं, ते या लोकांनी पाहिलं नव्हतं; पण त्यानंतरही कित्येक दिवस सोपान वेद पाठांतराला बसला की, त्याच्या डोळ्यांसमोर भगवान श्रीविष्णूंच्या रूपातली ज्ञानादादाची मूर्ती उभी राही आणि तो सगळा प्रसंग जसाच्या तसा त्याला आठवत असे !

(क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

**अध्याय ९ : राजविद्या राजगुह्ययोग**

**मूढ लोक मज मनुष्य म्हणती । अज्ञान माझी गती नेणती । परम उत्कर्ष असोनि सर्व भूतीं । मज म्हणती मनुष्य देही ।।**

मज मानव-रूपांत तुच्छत्वें मूळ देखती ।
नेणूनि थोरलें रूप जे माझे विश्व-चालक ।।११।।

**त्या पुरुषाची आशा निर्फळ । तैसेचिं ज्ञान आणि मन चंचळ । तयाचि गति नाहीं निर्मळ । राक्षसी असुरी मोहें योनि पावे ।।**

ते आशा-वाद मूढांचे कर्मे ज्ञानें हि तीं वृथा ।
संपत्ति जोडिली ज्यांनी आसुरी मोह-कारक ।।१२।।

**थोर महंत मज मानिती । अर्जुना ते दिव्य प्रकृति ।**
**ते आश्रित आपुले मनोभावें मज तत्पर होती ।**
**मी सर्व भूताचि आदि अवसान म्हणोनिया ।।**

दैवी संपत्ति जोडूनि महात्मे भजती मज ।
अनन्य-भावें जाणूनि मी विश्वारंभ शाश्वत ।।१३।।

**माझें कीर्तन सदा करी । हें व्रत सदा मनीं दृढ धरी । आणिक भक्ति उपासना विचारी । मज तत्पर होउनी।।**

अखंड कीर्तनें माझ्या यत्न-शील दृढ-व्रती ।
भक्तीनें मज वंदूनि भजती नित्य जोडिले ।।१४।।

**किती एक ज्ञानयज्ञें करून । माझी उपासना करिती जाण । मज भजती एकत्त्वें पृथकत्त्वें करून । असे विश्वतोमुखी ।।**

दुसरें ज्ञान-यज्ञानें भजती व्यापका मज ।
ब्रह्म-भावें विवेकानें अविरोधें चि देखुनी ।।१५।।

**अर्जुना सुलभ होई । माझें ठायी चित्त अर्पी तें ही ।**
**मन मत्स्वरुपीं ठेवूनी पाही । योगयुक्त करुनियां ।।**
**मीचि याग आणि यज्ञ कारण । मीचि स्वधाकार औषधि जाण । मंत्र अज्य आदि करून । हुतही मीच।।**

मी चि संकल्प मी यज्ञ स्वावलंबन अन्न मी ।
मंत्र मी हव्य ते मी चि अग्नि मी मी चि अर्पण ।।१६।।

**मी जगाचा माता-पिता । पितासह श्रेष्ठ कर्ता ।**
**मी ॐकार असतां । ऋग यजु साम वेद मी ।।**

मी ह्या जगास आधार माय बाप वडील मी ।
मी तिन्ही वेद ॐकार जाणण्या योग्य पावन ।।१७।।

**मी गति आणि पोषकु । समस्ताचा साक्षभूत एकु ।**
**आणि अधिष्ठान रक्षकु । श्रेष्ठ तो मी ।।**

साक्षी स्वामी सखा भर्ता निवास गति आसरा ।
करी हरी धरी मी चि ठेवा मी बीज अक्षय ।।१८।।

**उत्पत्ति प्रळय स्थान । मीच असें सर्वांचे कारण ।**
**बीज अव्यय जाण । मीच असे ।।**

तापतों सूर्य-रूपे मी सोडितो वृष्टि खेचितो ।
मृत्यु मी आणि मी मोक्ष असें आणि नसें हि मी ।।१९।।

**उष्ण तपोनि वृष्टि वरुषे । बळकारें मीचि असे ।**
**सोडविणार मृत्यु अमृत्य विशेषें संत असंत मीच अर्जुना।।**

वेदाभ्यासी सोम-पाने पुनीत । माझ्या यज्ञे इच्छिती स्वर्ग जोडू । ते पुण्याने जाउनी इंद्र-लोकी । तेथीचे ते भोगिती दिव्य भोग ।।२०।।

# मुलांचे पान




» चित्र रंगवा




पान १८ वरून...

## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



## मनाला खुपणारं कागदावर

# बदलती कुटुंबव्यवस्था आणि नाती

(लेखांक ९)

आई-बाबा आणि त्यांची मुलं म्हणजे कुटुंब. अशी अनेक कुटुंबं एकत्र राहतात तेव्हा त्याला परिवार म्हणायचं. असे परिवार किंवा एकत्र कुटुंबपद्धती आज नाहीशी होत चालली आहे. विभक्त कुटुंबव्यवस्थाच प्रामुख्याने रूढ होऊ लागली आहे. काही वर्षांपूर्वीचं गाव जसं आज नाही, त्याप्रमाणे तेव्हासारखी ग्रामीण भागांत दिसणारी एकत्र कुटुंबंही आज नाहीत. एकत्रित शेतीमुळे कुटुंबही एकत्रित रहात. ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेमधील बदल हा प्रामुख्याने बदलत्या ग्रामीण स्त्रीमुळे झाला असे म्हटल्यास चुकू नये. बचत गटाद्वारे ती आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करते. शिक्षणामुळे प्राथमिक शिक्षिका, अंगणवाडी सेविका अशी नोकरीही ती करू लागली. नोकरीच्या ठिकाणी जाण्यासाठी तिला वेळेचं बंधन, वेळ पाळण्याचं बंधन स्वीकारावं लागतं. जे एकत्र कुटुंबामध्ये अडचणीचं ठरू शकतं. शिवाय तिला मिळणारा दरमहाचा पगार हाही वादाचा मुद्दा होतो. शेतीचं उत्पन्न आणि पगारावाटे मिळणारा पैसा यामुळे ते कुटुंब इतरांपासून विभक्त होऊ पहात. शेती व्यवसाय सामायिकपणे चालू राहू शकतो, पण या मिळवत्या स्त्रीमुळे कुटुंब विभक्त होऊ शकते. विशेषत: समजूतदारपणाचा अभाव असेल तर होणारच.

कुटुंबातील स्त्री शिक्षित असेल तर सहाजिकच तिची मुलंही शिकतात. उच्चशिक्षित होतात, नोकरीसाठी दुसरीकडे, दुसऱ्या गावात, शहरात रहायला जातात. पुढे तेथेच स्थायिक होतात. बेताचं शिक्षण असेल तरी लहान गावात सर्वांना नोकरी मिळू शकत नाही. त्यामुळेही कुटुंबं विभक्त होतात. पूर्वी दोन-तीन पिढ्या एकत्र एका घरात रहात असत. बदलत्या कायद्यामुळे शेती गमावणं, छोट्या गावात सर्वांना व्यवसाय करता न येणं, उच्च शिक्षणासाठी गाव सोडून बाहेर जाणं आणि त्यानंतर नोकरी व्यवसायामुळे देशांत इतरत्र किंवा परदेशांतही स्थायिक होण्यामुळे विभक्त कुटुंबपद्धती अपरिहार्य झाली. आता एकत्र कुटुंबामुळेच नाती टिकतात असे म्हणणेही धाडसाचे होईल. माझ्या पाहण्यात काही परिवार असे आहेत, जिथे वृद्ध आई, दोन मुलगे, सुना, चार नातवंडं एकत्र राहतात. पण प्रत्येकाचा सवता सुभा. कोणी कोणाशी बोलत नाही, एकत्र राहूनच सुख मिळत का? मिळेल का? याचा सर्वांनी विचार करावा. मनं जुळलेली नसताना एकत्र कुटुंबपद्धती चांगली म्हणून एकत्र राहण्यापेक्षा विभक्त राहून पुढच्या पिढीतील कां होईना नाती टिकवण्याचा प्रयत्न करावा.

मोबाईल फोनसारख्या संपर्क साधनांमुळे जग जवळ येत आहे, पण आयुष्याच्या धावपळीमुळे समक्ष संपर्क, एकमेकांकडे जाणं-येणं, एकदोन दिवस राहणं जवळजवळ थांबलं आहे. हे कोणीही मुद्दाम करत नाही. ‘कालाय तस्मै नम:’ एवढंच म्हणावं लागेल. दोघेही नोकरी करणारी, व्यवसायिक असतील तर बघायलाच नको. रोजच्या घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या दिनक्रमामध्ये येणाऱ्या नातेवाईकांची उठबस करणं शक्य नसतं. त्यामुळे आपण कुणाकडेही जाऊया नको, आपल्याकडेही कुणी यायला नको असा विचार मनात आला तर चुकीचे म्हणता येणार नाही. मुलांच्या शाळांची सुटी आणि आईबाबांची रजा यांचा ताळमेळ घालायचा आणि कुठेतरी सहलीला जाऊन, हॉटेलात राहून ताजेतवाने व्हायचे आणि पुन्हा घड्याळाच्या काट्यावर फिरत रहायचे.

काही अपवाद सोडले तर ‘हम दो हमारे दो’ किंवा ‘हम दो हमारी एक’ हे सूत्र बहुसंख्य आईवडिल

आपल्या मुलांना योग्य, उत्तम आणि मनाजोगं शिक्षण देता यावं यासाठी अमलात आणतात. कारण प्रत्येक क्षेत्रांत प्रचंड स्पर्धा आहे. घर ही मुलांची सर्वात पहिली आणि अत्यंत महत्त्वाची शाळा असते. घराच्या चार भिंतीत, सुरक्षित वातावरणांत आजी-आजोबा, आई-बाबा आणि दोन-तीन भावंडं यांच्याबरोबर वाढताना मुलं अनेक गोष्टी सहज शिकतात. प्रेम, सहिष्णुता, त्याग, सर्वांशी जमवून घेणं, प्रसंगी आपली वस्तू आपल्या भावंडांना देणं हे सारं मुलं सहजपणे शिकतात. एकुलतं एक मूल किंवा जास्तीत जास्त दोन असली तर मुलांवर कौतुकाचा वर्षाव होतो. मुलं मागतील त्या वस्तू लगेच मिळतात. शिवाय वस्तू महागातली असेल तर उगीच कुणाला दाखवून देत बसू नकोस असंही सांगितलं जातं. सहाजिकच ही मुलं स्वार्थी, स्वकेंद्री आणि हट्टी होतात. आपण आपल्या मुलाला तो मागेल ती प्रत्येक गोष्ट पुरवतो आहोत. त्यामुळे आपल्या मुलाने प्रत्येक ठिकाणी उज्ज्वल यश मिळवलेच पाहिजे अशी आई-वडिलांची अपेक्षा असते. त्याप्रमाणे ते बोलूनही दाखवतात. अपेक्षेइतकं यश मिळालं नाही, तर नैराश्यातून मुलं अगदी टोकाचा निर्णय घेताना नातं कायमचं नाहीसं होतं.

आम्ही लहान असताना सुटीमध्ये मामा-मावशी, काका-आत्या यांच्याकडे जात असू. एक-दोन मामा, एखादी मावशी, आत्या असायची. आता मामा तरी असेल किंवा मावशी तरी असेल, काका किंवा आत्या असेल, बहुसंख्य वेळेला यापैकी कोणीच नसतं. म्हणून मग मुलांना सुटीत संस्कार शिबीर किंवा इतर कसल्यातरी वर्गामध्ये मुलाला गुंतवून ठेवावं लागतं. घरात मोजकी माणसं, मुलांची सुद्धा झोपण्याची स्वतंत्र खोली. त्यामुळे कुणाकडे रहायला गेलं तर जमवून घेणंही कठीण जातं. कुटुंबातील सदस्य संख्या कमी झाल्यामुळे लहान मोठे घरगुती कार्यक्रमही होत नाहीत. झालेच तर एखादा हॉल काहीवेळासाठी पैसे भरून घेतला जातो. सारी व्यवस्था त्यांच्याकडेच त्यामुळे काही वेळासाठी नातेवाईक, मित्रमंडळी एकत्र येतात. मनमोकळं बोलणं, रहाणं होत नाही. पूर्वी विवाहसमारंभ, मुंज इ. नातेवाईकांच्या मदतीनं अगदी यथासांग पार पडत असत. आता लग्नासाठी कार्यालये अगदी संपूर्ण व्यवस्थेसह घेतली जातात. त्यामुळे आधीच्या तयारीसाठीही नातेवाईंकांना जमावं लागत नाही. मुलीच्या लग्नामध्ये तर मुलीला प्रथम सासरी जाताना देण्याच्या वस्तू आणि नंतरच्या सणांना देण्याच्या वस्तू जवळच्या नातेवाईंकाकडून दिल्या जात. यामुळे आईवडिलांवरील खर्चाचा भार हलका होत असे. त्यामुळे नातेवाईकांचं भावनिक पाठबळ रहात असे.

कुटुंबातील स्त्री नोकरी करणारी असो किंवा गृहिणी, नाती टिकवण्यामध्ये किंवा नात्यांचे धागे तोडण्यामध्ये स्त्रीची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. नातेसंबंध जपण्यासाठी विश्वास, आदर, बंधन, जबाबदारी उचलण्याची तयारी आवश्यक आहे. तसंच समोरच्या व्यक्तीचं वय, स्वभाव समजून घेतला तर प्रत्येकाला एक पाऊल मागे येऊन नाती जपता येतात. घोडा का अडला? भाकरी का करपली? या दोन्ही प्रश्नांचं उत्तर एकच आहे. त्याप्रमाणे नाती का तुटतात? याचंही उत्तर समजून घेतलं नाही हेच असतं. स्त्रीप्रमाणेच बदलत्या


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

गोखले ब्रदर्स

सराफी दुकान

गुरुवार 21 : गुरुपुष्यामृत

आपलं दुकान

महाद्वार रोडवर

0231-2546585

कुटुंबव्यवस्थेमध्ये नाती टिकवण्याची जबाबदारी घरातील वडिल व्यक्तींनी सांभाळली पाहिजे. झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीमुळे मुलगा-सून यांच्याबरोबर राहण्याचं भाग्य जर तुम्हाला लाभलं असेल तर तुम्हीच नातं टिकवलं पाहिजे. वडाच्या झाडाचा मूळ बुंधा दरवर्षी नव्यानं फुटणाऱ्या पारंब्यांना आपल्यात समावून घेतो. मूळ बुंधा म्हणजे आधीच्या पिढी - म्हणजे तुम्ही स्वत: आणि पारंब्या म्हणजे नवीन पिढी. या नव्या पिढीला समजून घ्या. तुम्ही असे कसे रे? आम्ही कसे वागत होतो? इ.इ. त्यांना आजिबात ऐकवू नका. आजच्या पिढीला प्रत्येक बाबतीत आव्हानांना आणि प्रचंड स्पर्धेला सामोरं जावं लागत आहे. समजून घ्या. पंचवीस-तीस वर्षांपूर्वीच्या इतकं सरळ, सहज, साधं, सोपं आयुष्य आता नाही. हाताशी सुविधा खूप आहेत, पण व्याप आणि धावपळ खूप वाढली आहे. आपल्याकडून होईल तेवढी मदत करावी, पण त्यांच्या कामात किंवा इतर गोष्टीत ढवळाढवळ करू नये. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या वाढत्या वयाचं आणि थकणाऱ्या शरीराचं भान ठेवून प्रत्येक लहान मोठ्या समारंभात सहभागी होणे शक्य असेल तर टाळावे. कारण तुम्हाला सांभाळून नेणं, आणणं, तिथं तुमच्याकडं लक्ष देणं हे तुमचा मुलगा, सून, नातवंडं इ. ना त्रासदायक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आजकाल अनेक आई-वडिल फक्त मुलगी असेल तरी दुसऱ्या मुलाचा विचार करत नाहीत. एकुलती एक मुलगी असेल तर तिनेही आपल्या वृद्ध आईवडिलांचा सांभाळ केला पाहिजे असे म्हणावेसे वाटते. दोघे हयात असतील तोवर एकमेकांच्या आधाराने राहतील, पण कुणी एकजण आधी हे जग सोडून गेला तर मागे राहिलेल्या व्यक्तीला मुलीने आपल्या घरी आणले पाहिजे. यासाठी तिच्या सासरच्या मंडळींकडून तिला सहकार्य मिळाले पाहिजे. याबरोबरच मुलीच्या सासरी वृद्धापकाळी येऊन राहिल्यानंतर मुलीच्या आई-वडिलांनी संयमाने योग्य प्रकारे वागले पाहिजे. कागदोपत्री घराचा मालक पुरुष असला तरी घरांतील अंतर्गत सत्ता आणि दैनंदिन गोष्टीमध्ये घरातल्या स्त्रीची भूमिका महत्त्वाची असते. या वस्तूस्थितीचा गैरफायदा मुलीच्या सासरी राहणाऱ्या तिच्या आई-वडिलांकडून घेतला जाऊ नये. प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीत लक्ष घालणे, हे असं कर, तसं करू नको वगैरे सूचना देणं टाळलंच पाहिजे. आपले मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांना वरचेवर घरी घेऊन येणे आणि त्यांचं चहापाणी करून निवांत गप्पा मारत बसणं कटाक्षानं कमी केलं पाहिजे. कामवाल्या बाईला-तिच्या कामाबद्दल बोलू नये.

माझ्या परिचयाच्या एक बाई. वयाच्या चाळीशीत त्यांना एकुलतं एक मूल-मुलगी झाली. मुलीच्या लग्नानंतर पाच-सहा वर्षांत पतीचं निधन झालं. पाठोपाठ त्या बाईंनाही हृदयविकाराचा त्रास सुरू झाला. चाचण्यांनंतर एक लहानशी हृदय शस्त्रक्रिया करावी लागली. शस्त्रक्रियेच्या आधी आणि नंतर काही दिवस असे जवळजवळ चार महिने त्या मुलीच्या सासरी रहात होत्या. मुलीचा सहा-सात खोल्यांचा दुमजली बंगला. त्यांना स्वतंत्र खोलीत ठेवलं होतं. प्रकृती छान बरी झाल्यावर त्या मोकळेपणानं मुलीच्या घरात वावरत होत्या. आता आपण कायमच इथंच रहावं असं त्यांना वाटू लागलं. तसं त्यांनी मुलीपाशी बोलून विषयही काढला. पण यावर मुलगी काहीच बोलली नाही.तिलाही अनेक वेळेला आपल्या आईचं वागणं खटकत होतं. तिच्या सासऱ्यांनी तर तिला स्पष्टच सांगितलं होतं, 'तीन-चार महिन्यात आले एवढे अनुभव खूप झाले. तुमची आई म्हणून दर महिन्याला त्यांना उचलून पैसे द्या. त्यांचं घर तसं जवळ आहे. रोज जेवणही पाठवा, पण त्यांचं कायमचं आपल्या घरी वास्तव्य नको.'

वृद्धापकाळी कुटुंबाच्या आधाराने जगायचे असेल तर जमवून घ्यावेच लागेल. अर्थात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आजकाल अनेकांना एकटे किंवा वृद्धाश्रमाच्या आधारानेच रहावे लागते. आजकाल आपण समाजात आपल्या आसपास नजर टाकली तर

**पान २० वर पहा...**

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक चार)**

आज श्री. शिढोरे यांच्या घरी अल्पोपहार केला व सौ. शिढोरे वहिनी यांनी दुपारच्या जेवणासाठी तिखट मिठाच्या पुऱ्या व दही मिरची दिली ती घेऊन सकाळी आठ वाजता प्रवास सुरू केला. आजचा प्रवास शिवपुरी ते ग्वाल्हेर असा १२० किलोमीटरचा होता. शिवपुरी ग्वाल्हेर पेक्षा उंचावर असल्यामुळे रस्त्याला उतार होता. पण रस्ता कमी रहदारीचा व जंगलातून जाणारा होता त्यामुळे रस्त्याच्या बाजूला गावे किंवा ढाबे नव्हते. आज शनिवार होता व हायवेवरच गुरावल गावाजवळ एक शनी मंदिर होते तिथे थांबून दर्शन घेतले व परत मार्गस्थ झालो. दुपारी घाटीगाव येथे माझ्याजवळचा डबा खाल्ला व दुपारी तीन वाजता ग्वाल्हेर येथे पोहोचलो. ग्वाल्हेरमधील डिकॅथलॉन येथे जाऊन सायकल चेक अप केले व ग्वाल्हेरमधील गजानन महाराज मंदिर जे की मला श्री. शिढोरे यांनी राहण्यासाठी सुचवले होते व गुगल मॅपवर पण दाखवत होते ते शोधत तिथे पोहोचलो. पण तिथे मंदिर अस्तित्वातच नव्हते. आता मुक्काम कुठे करायचा हा प्रश्न माझ्यापुढे होता. पण माझ्या प्रश्नाचे उत्तर मला आज सकाळीच वाटेत भेटून माझी विचारपूस केलेल्या श्री. नमन संधू यांनी दिले होते, त्यांनी मला ग्वाल्हेर किल्लयावर असलेल्या गुरुद्वारामध्ये राहण्याची उत्तम व्यवस्था होईल असे सांगितले होते. तेव्हा माझे राहण्याचे ठिकाण ठरले असल्यामुळे त्यांच्या सांगण्याकडे मी दुर्लक्ष केले पण आता ते आठवल्यावर मी तिकडे जायला निघालो. जाताना वाटेतच राणी लक्ष्मीबाई यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन अंधार पडता पडता गोल पहाडीवर असलेल्या ग्वाल्हेर किल्लयातील गुरुद्वारामध्ये वस्तीला गेलो. गुरुद्वारामध्ये राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. सकाळी लवकर उठून आवरा आवर करून निघालो व किल्लयावर असलेला राजा मानसिंग याचा भव्य महाल पाहिला व किल्लयावरून खाली उतरू लागलो. उतरताना पहाडाच्या भिंतीमध्ये कोरलेली भव्य शिल्प ही फारच मनमोहक दिसत होती. शहरांमध्ये कोणार्क सूर्य मंदिरासारखे श्री घनश्यामदास बिर्ला यांनी बांधून घेतलेले सूर्य मंदिर आहे ते पाहून पुढचा प्रवास सुरू झाला. दुपारी बारा वाजता मुरैना येथील एका राम मंदिरात भोजन भिक्षा घेतली व थोडी विश्रांती घेऊन धौलपूरकडे निघालो धौलपूर हे राजस्थान मधील चंबळ खोऱ्यातील मध्य प्रदेश व राजस्थान ह्या सीमेवरील शहर आहे आज मी चंबळ नदी ओलांडून वीरभूमी राजस्थानमध्ये प्रवेश केला. रात्री मनिया गावात हायवेवरील हनुमान मंदिरात वस्ती केली. शेजारीच असलेल्या ढाब्यावर भोजन भिक्षा घेतली. सकाळी सहा वाजता निघालो आज राजस्थानचे अवघे ४० किलोमीटरचे अंतर पार करून उत्तर प्रदेश मध्ये प्रवेश केला व साडेनऊ वाजता आग्रा शहरात पोहोचलो शहरातून जायचे असल्यामुळे शहरातील सदर, बिजली घर, हत्ती घाट, व आग्र्याचा लाल किल्ला ह्या वास्तू बाहेरूनच बघितल्या. लाल किल्लयाचा परिसर व तटबंदी फारच मोठी आहे. ह्याच किल्लयामध्ये येऊन आपल्या दोन्हीही छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांनी औरंगजेबाला आव्हान दिले होते व त्याची लायकी दाखवली होती. तिथून पुढे हाथरस गावातून पुढे जाऊन सासनी गावी पोहोचलो. गावात सुरू असलेल्या भागवताचा थोडा वेळ आस्वाद घेतला व गावाबाहेरील महादेव मंदिरात वस्तीला गेलो. ह्या मंदिरात एक महाराज राहत होते त्यांना विचारून तिथेच थांबलो. गावातील एका व्यक्तीने रात्री भोजन प्रसाद दिला.

**– ओंकार गाडगीळ,**
मोबा. ९८२२८७६९२२

## मनाला खुपणारं कागदावर - नात्यांचे धागे

**पान ७ वरून पुढे...**

अनेकजण एकेकटे राहताना दिसतात. सासू-सून, जावा-जावा, नणंद-भावजय यांच्यात शत्रुत्वच येणार. यांचं एकमेकांशी पटणारच नाही असं गृहित धरलं जातं. नोकरीसाठी मुलगा दुसऱ्या शहरात रहात असेल तर मुलाच्या लग्नानंतर आई-वडिल, मुलगा-सून हे एकत्र, एका घरात राहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. लग्नानंतर विवाहित मुलगा-सून आणि त्यांचे आई-वडिल एकाच गावात राहणार असतील तर अगदी योजनापूर्वक आर्थिक गणित जमवून मुलासाठी वेगळी सदनिका घेतली जाते. सुनेचा गृहप्रवेश, सासू-सासऱ्यांच्या घरी, सासरी न होता तिच्या घरात होतो. एकाच अपार्टमेंटमध्ये सासू-सासरे, मुलगा-सून खालीवर किंवा एकाच परिक्षेत्रातील दोन सदनिकांमध्ये राहतात. मोठ्या शहरात आज हे दृश्य अगदी सामान्य झाले आहे.

घरात दोन किंवा चार माणसं. प्रत्येकजण आपल्या व्यापात मग्न. कुणाला कुणाशी फारसं मोकळेपणानं बोलायला वेळ नाही. कारण हाताशी स्मार्ट फोन असतो, जोडीला बऱ्यापैकी पैसा असेल तर तरुण पिढी कदाचित व्यसनाधीन आणि नैराश्याकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- कमल हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६,

## बर्म्युडा ट्रँगलचे रहस्य

**पान ७ वरून...**

हे तरी त्या बुडालेल्या जागीच आजही असायला हवे होते.... तेही का मग सापडत नाहीय??

असे अनेक प्रश्न उत्तरासाठी आजही आ वासून उभे आहेत आणि आजही वर्षाला सरासरी ३० लहानमोठया बोटी आणि प्रायव्हेट छोटी विमाने इथं गायब होत आहेत, पण त्यांचाही कांही ठावठिकाणा किंवा एखादा भागही सापडत नाहीय.

या सर्व माहितीच्या आधारे इतकच म्हणता येईल की बर्म्युडा त्रिकोणाबद्दल आजही या अत्यंत प्रगतीशील युगातही आपण फक्त अंदाजच बांधू शकतो.

So Bermuda Triangle is still a Mystery......

We humans do make whatever discoveries or prepare advanced technology...but still We are at mercy of NTURE...

**हे असं नेमकं घडतं तरी का?? व कसे??**

याबद्दल तर अगदी शेकड्याने थेअरी उपलब्ध आहेत. यापैकी बऱ्याच थेअरी मी वाचल्या, डॉक्युमेंटरी पाहिल्या आणि यातील ज्या थेअरी माझ्या अभ्यासानुसार, अनुभवानुसार आणि समजुतीनुसार त्या घटनांशी सुसंगत वाटल्या त्याबद्दल मी तुम्हाला वरती सांगितले आहे. याबद्दलही अनेक लोकांची वेगवेगळी मते असणार यात मला शंका वाटत नाही. कारण कोणत्याही जागतिक स्तरावरील वैज्ञानिक संस्थेने आजपर्यंत या आश्चर्यकारक ठिकाणाची नेमकी माहिती किंवा यामागील शास्त्रीय कारण शोधण्यास असमर्थ ठरल्या आहेत. प्रत्येक अभ्यास आणि शोध कार्यानंतर असे कांही कारण असावे असाच एकूण सूर प्रत्येक शोधकर्त्या कमिटीने आजपर्यंत दिला आहे.

(त्यामुळे मी इथं दिलेली माहिती ही त्याच आधारावर प्रकाशित करत आहे याची नोंद घ्यावी.)


तर असा हा बर्म्युडा त्रिकोण... आणि त्याची मला उमगलेली माहिती. ते असो पण... मला स्वतःला अजून एक प्रश्न अगदी कॉलेजमध्ये आल्यापासून सतावतो आहे की अश्या अतिविचित्र आणि रहस्यमयी जागेचे नाव बर्म्युडा हे आपल्या (दादा कोंडकेनी जगप्रसिद्ध केलेल्या) पुरुषी चड्डीला काय म्हणून देण्यात आले असावे???...

ऐ माझी बर्म्युडा कुठाय रे?? अजून वाळतच घातलीय व्हय तिला ???

एक समुद्री वळवळ्या

**बापा - बाळासाहेब पाटोळे**

# 'भारतरत्न' नानाजी देशमुख



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिले सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्याशी त्यांचे कौटुंबिक संबंध होते. हेडगेवार यांनी नानाजींची प्रतिभा ओळखून त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाण्यासाठी प्रोत्साहित केले.१९३० च्या दशकात ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले. १९४० मध्ये, डॉ. हेडगेवार यांच्या निधनानंतर, नानाजींनी महाराष्ट्रातील अनेक तरुणांना आरएसएसच्या शाखांमध्ये सामील होण्यासाठी प्रेरित केले. नानाजीनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले.

चंडिकादास अमृतराव देशमुख ऊर्फ नानाजी देशमुख यांचा जन्म ऑक्टोबर ११, १९१६ रोजी हिंगोली जिल्ह्यातील कडोळी या गावी झाला. लहानपणी त्यांचे आई वडील मृत्यू पावल्याने त्यांचे पालनपोषण त्यांच्या मामानी केले. पिलानी येथील बिर्ला इन्स्टिट्यूटमधून त्यांनी उच्च शिक्षण घेतले नानाजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. लहानपणी भाजी विकून पैसे मिळवून शिक्षण पूर्ण करणारे नानाजी संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या संपर्कात आले व संघाशी कायमचे जोडले गेले. पुढे काही वर्षे त्यांनी देशाच्या राजकारणात प्रमुख भूमिका निभावली. राजकारण किंवा सत्ताकारणाच्या मर्यादा लक्षात घेऊन अखेरीस त्यांनी शाश्वत विकास साधणारे समाजकार्य करायचे ठरवले भारतीय संस्कृतीच्या आधारावर मनुष्याचा सर्वांगीण विकास होऊ शकतो या विचाराला मध्यवर्ती स्थान देऊन रचनात्मक कामाचे अनेक प्रकल्प नानाजी देशमुख यांनी देशभरात उभे केले.

नानाजी देशमुख हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या राष्ट्रवादी विचारसरणीने प्रेरित होते. टिळकांच्या प्रेरणेने त्यांनी समाजसेवा आणि सामाजिक कार्यात रस घेतला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री गुरुजींनी त्यांना प्रचारक म्हणून उत्तर प्रदेशला पाठवले. पुढे, त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आणि ते उत्तर प्रदेशचे प्रांतीय प्रचारक बनले. आग्रा येथे त्यांची पहिली भेट दीनदयाळ उपाध्याय यांच्याशी झाली. नंतर, ते गोरखपूरला गेले आणि त्यांनी लोकांना संघाची विचारधारा समजावून सांगितली. नानाजी देशमुख संघाचे कार्य विस्तारण्यासाठी बरहलगंजच्या पूर्वेला ९ किलोमीटर अंतरावर असलेल्या हाटा बाजार गावात आले. बाबू जंग बहादूर चंद उर्फ जंगी संन्यासी यांच्या घरी राहून, त्यांनी बाबूंना संघाचे स्वयंसेवक बनवले आणि त्या भागातील पहिली शाखा सुरू केली. या राष्ट्रसेवेच्या कार्यात त्यांना बाबा राघवदास यांचेही सहकार्य लाभले. बाबा राघवदासांनी त्यांना या अटीवर राहण्याची परवानगी दिली की, त्यांनी

त्यांच्यासाठी स्वयंपाक करावा. तीन वर्षांच्या आत, त्यांच्या कष्टाचे फळ मिळाले आणि गोरखपूरच्या आसपास संघाच्या अडीचशे शाखा झाल्या. नानाजींनी शिक्षणाला खूप महत्त्व दिले. त्यांनी गोरखपूरमध्ये पहिले सरस्वती शिशुमंदिर स्थापन केले. १९४७ मध्ये, आरएसएसने राष्ट्रधर्म आणि पंचजन्य ही दोन साप्ताहिके, आणि स्वदेश (एक हिंदी वृत्तपत्र) प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. अटल बिहारी वाजपेयी यांच्यावर संपादनाची, दीनदयाळ उपाध्याय यांच्यावर मार्गदर्शनाची आणि नानाजींवर व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. निधीच्या कमतरतेमुळे, वृत्तपत्रे आणि मासिके प्रकाशित करणे हे संस्थेसाठी एक अत्यंत कठीण काम होते.

१९४८ मध्ये गांधीजींच्या हत्येनंतर, आरएसएसवर बंदी घालण्यात आली. जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील बंदी उठवण्यात आली, तेव्हा भारतीय जनसंघ ही एक राजकीय संघटना म्हणून स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. श्री गुरुजींनी नानाजींना उत्तर प्रदेशातील भारतीय जनसंघाचे सरचिटणीस म्हणून पदभार स्वीकारण्यास सांगितले. उत्तर प्रदेशात पक्षाची स्थापना करण्यात नानाजींच्या पायाभूत कामाची महत्त्वपूर्ण भूमिका होती. १९५७ पर्यंत, जनसंघाने उत्तर प्रदेशातील सर्व जिल्ह्यांमध्ये शाखा स्थापन केल्या होत्या. या काळात नानाजींनी संपूर्ण उत्तर प्रदेशभर दौरे केले आणि परिणामी, भारतीय जनसंघ लवकरच उत्तर प्रदेशातील एक प्रमुख राजकीय शक्ती बनला नानाजींनी संघाचे तत्कालीन सरसंघचालक श्री गोळवलकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चारित्र्याच्या आधारावर एक नवीन राजकीय पक्ष उभा करण्यासाठी प्रयत्न केले. यातूनच जनसंघाची स्थापना झाली. दीनदयाळ उपाध्याय, सुंदरलाल भंडारी, अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्यासमवेत नानाजी जनसंघ पक्षाच्या माध्यमातून कार्यरत होते. नंतर जनता पक्षाच्या माध्यमातूनही ते राजकारणात सक्रिय सहभागी झाले. उत्तर प्रदेशात, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची दूरदृष्टी, अटलबिहारी वाजपेयी यांची वक्तृत्वकला आणि नानाजींच्या संघटनात्मक कार्यामुळे भारतीय जनसंघ एक महत्त्वपूर्ण राजकीय शक्ती बनला. नानाजींचे केवळ पक्षाच्या कार्यकर्त्यांशीच नव्हे, तर विरोधी पक्षांशीही उत्कृष्ट संबंध होते. त्यामधून डॉ. राम मनोहर लोहिया यांच्यासोबतच्या त्यांच्या चांगल्या संबंधांनी भारतीय राजकारणाचे स्वरूप आणि दिशा दोन्ही बदलले. एकदा नानाजींनी डॉ. लोहिया यांना भारतीय जनसंघाच्या कार्यकर्त्यांच्या परिषदेत आमंत्रित केले होते, जिथे लोहिया दीनदयाल उपाध्याय यांना भेटले. त्यांच्या युतीमुळे भारतीय जनसंघ समाजवाद्यांच्या अधिक जवळ आला. त्यांनी एकत्र येऊन काँग्रेसच्या गैरकारभाराचा पर्दाफाश केला. १९६७ मध्ये, भारतीय जनसंघ संयुक्त विधिमंडळ पक्षाचा भाग बनला आणि चौधरी चरण सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सामील झाला. नानाजींचे चौधरी चरण सिंग आणि डॉ. राम मनोहर लोहिया या दोघांशीही चांगले संबंध होते, त्यामुळे आघाडी घडवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उत्तर प्रदेशात पहिले बिगर-काँग्रेस सरकार स्थापन करण्यासाठी विविध राजकीय पक्षांना एकत्र आणण्यात नानाजींचे योगदान उल्लेखनीय होते.

आचार्य विनोबा भावेंच्या भूदान चळवळीतही ते सहभागी झाले होते. सुमारे दोन महिने ते विनोबाजींबरोबर प्रवास करत होते. जेपी आंदोलनादरम्यान पोलिसांनी जयप्रकाश नारायण यांच्यावर लाठीमार केला तेव्हा नानाजींनी जयप्रकाश नारायण यांची सुटका केली. जयप्रकाश नारायण यांच्या आवाहनाला मानून त्यांनी संपूर्ण क्रांतीला पूर्ण पाठिंबा दिला. नानाजी जनता पक्षाचे एक प्रमुख संस्थापक होते. जनता पक्षाने काँग्रेसला सत्तेतून बाहेर काढून सत्ता मिळवली. आणीबाणी उठवल्यानंतर निवडणुका झाल्या, नानाजी बलरामपूर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. त्यांना

मोरारजी मंत्रिमंडळात उद्योगमंत्री म्हणून सामील होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले, परंतु नानाजींनी स्पष्टपणे नकार दिला. त्यांनी सुचवले की, साठ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या खासदारांनी राजकारणापासून दूर राहून संघटनात्मक आणि सामाजिक कार्यावर लक्ष केंद्रित करावे पण त्यानंतरच्या काळात मनुष्यविकास व सामाजिक विकास याबाबतच्या पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्मिक मानवतावाद या तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. याच तत्त्वज्ञानाच्या आधारावर रचनात्मक, विधायक कामांची उभारणी करण्याचा ध्यास घेतलेल्या नानाजींनी जनता पक्षाच्या सरकारमध्ये मंत्रिपद नाकारले. त्या काळात राजनीतीतील चाणक्य म्हणून त्यांचा दिल्लीत दबदबा होता, अनेक महत्त्वाची सत्तापदे त्यांच्याकडे सहजगत्या येत होती. पण त्यांनी तो मोह निग्रहाने नाकारून, राजकारण-संन्यास घेऊन अखंडपणे सेवाकार्य करण्याचा निर्णय घेतला. या विचारातूनच त्यांनी दीनदयाळ संशोधन संस्था स्थापन केली.

१९८० मध्ये, वयाच्या साठव्या वर्षी, त्यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेतली आणि 'आदर्श'ची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक आणि विधायक कार्यासाठी समर्पित केले. ते आश्रमांमध्ये राहिले पुढील काळात त्यांनी दीनदयाळ शोध संस्थानच्या माध्यमातून सर्वप्रथम उत्तर प्रदेशामधील गोंडा जिल्ह्यात सिंचनाचे कार्य केले. सुमारे ४०,००० कूपनलिकांच्या माध्यमातून त्याठिकाणच्या शेतकऱ्यांना सिंचनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचे काम केले. त्यानंतर मध्य प्रदेशातील चित्रकूट जिल्ह्यात ८० दुर्गम, पहाडी गावांमधील जनतेला विविध प्रकल्पांद्वारे आत्मनिर्भर व उद्योगशील बनवण्यावर त्यांनी मुख्य लक्ष केंद्रित केले. पाणी अडवा - पाणी जिरवा या योजनेतून सिंचनक्षेत्रात वाढ, गोवंशसंवर्धन, पारंपरिक कृषी पद्धतींचा विकास व प्रसार, गुरुकुल पद्धतीने शालेय शिक्षण, उद्योजकता विद्यापीठाच्या मार्गाने स्वयंरोजगाराला प्राधान्य, आरोग्यधाम योजनेअंतर्गत आयुर्वेदिक वनौषधींविषयी संशोधन व याच पद्धतीचे अनेक प्रकल्प चित्रकूट परिसरात कार्यान्वित केले. येथेच नानाजींनी चित्रकूट ग्रामोदय विश्वविद्यालय हे भारतातील पहिले ग्रामीण विद्यापीठ स्थापन केले. हे प्रकल्प सक्षमतेने चालवण्यासाठी त्यांनी समाजसेवेची इच्छा असणाऱ्या दांपत्यांना समाजशिल्पी बनवले. या समाजशिल्पींच्या माध्यमातून दीनदयाळ शोध संस्थेची विधायक, विकासात्मक कामे वेगाने, योग्य दिशेने व निष्ठेने चालू आहेत. आर्थिक, औद्योगिक व सामाजिकदृष्ट्या स्वयंपूर्ण गावांची संकल्पना येथे अस्तित्वात आलेली दिसते.

या सर्व कार्याला धर्माचे अधिष्ठान असावे या हेतूने व आपल्या सर्वांच्या जीवनात काय आदर्श असावेत हे सूचित करण्यासाठीच चित्रकूटमध्ये अभूतपूर्व असे श्रीरामदर्शन हे कायमस्वरूपी प्रदर्शन उभे करण्यात आले आहे. रामायणातील घटना डोळ्यासमोर उभ्या करणाऱ्या या प्रदर्शनासह येथे प्राणिसृष्टीही उभी करण्यात आली आहे. वास्तवातील जंगलात प्राण्यांचे हुबेहूब पुतळे बसवण्यात आले आहेत.

चित्रकूट हे त्यांचे कर्मस्थान होते. आरोग्यधाम व गोशाळा उद्यमिता विद्यापीठ, ग्रामोद्योग विद्यालय, आश्रमशाळा गुरुकुल, ग्रंथालय, मातृसदन, दंतचिकित्सा केंद्र इत्यादी त्यांनी तेथे उभारली. ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यास व त्यांना स्वावलंबी बनविण्याचा त्यांना ध्यास होता. त्यांनी सुमारे इ.स. १९९० चे दरम्यान मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यांतील प्रत्येकी सुमारे २५० गावे दत्तक घेतली व त्या गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. शिक्षण, स्त्रियांना गृहोद्योग, स्वच्छता, शुद्ध बोलणे इत्यादी शिकविण्यास त्यांनी कार्यकर्त्यांचा एक चमू उभारून ग्रामविकासाचे काम चालवले. नानाजींच्या याच कामाचे फलित म्हणजे चित्रकूट क्षेत्रातील ८० खेड्यांमधील कोर्टामध्ये चालू

असलेले जवळजवळ ६० टक्के खटले लोकांनी मागे घेतले व एकत्र बसून त्यावर निर्णय घेतले. चित्रकूटबरोबरच भारतातील इतर राज्यांमधील सर्वात मागास जिल्हे निवडून त्या ठिकाणी दीनदयाळ शोध संस्थानच्या माध्यमातून काम सुरू आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील होमरी येथे प्रकल्प कार्यरत आहे. सोनदरा गुरुकुल, कृषिविकास, आरोग्य शिक्षण, योगाभ्यास, कलांचे शिक्षण व औद्योगिक प्रशिक्षण या प्रकल्पांद्वारे येथे काम चालते.

आणीबाणीनंतरच्या काळात (इ.स. १९७७) नानाजी काही काळ लोकसभेचे सदस्य होते. इ.स. १९९९ मध्ये त्यांची राज्यसभेवरही निवड करण्यात आली. नानाजी देशमुख यांना १९९७ मधे पुणे विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही पदवी प्रदान केली.देशमुखांच्या सामाजिक कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना १९९९ साली पद्मविभूषण हा किताब बहाल केला उपराष्ट्रपती श्री भैरों सिंग शेखावत यांनी नानाजींना २००६ साली श्री. नरेश समता पुरस्कार प्रदान केला. नानाजी देशमुख यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी चित्रकूट येथील भारताच्या पहिल्या ग्रामीण विद्यापीठात निधन झाले. नानाजी हे भारतातील पहिले व्यक्ती होते ज्यांनी १९९७ मध्ये, त्यांच्या मृत्यूपूर्वीच, विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय संशोधनासाठी आपले शरीर दान करण्याची इच्छा व्यक्त करणारा मृत्युपत्र लिहिला होता. या इच्छापत्राचा सन्मान म्हणून, त्यांचे शरीर नवी दिल्ली येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेकडे (एम्स) सुपूर्द करण्यात आले.त्यांचा मृत्यू फेब्रुवारी २७, २०१० झाला. २०१९ साली राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .

**– विकास मेहंदळे,**

मोबा. ९४२०१५५११४

**दिनविशेष मे २०२६ पराभवनाम संवत्सरे** सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका

**वैशाख-ज्येष्ठ १९४८-४९** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**शुक्रवार दि. १ :** महाराष्ट्र दिन, कामगार दिन, बुद्ध पौर्णिमा, **मंगळवार दि. ५ :** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.१० वा.), **बुधवार दि. ६ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुण्यदिन, **शुक्रवार दि. ८ :** गुरु रविंद्रनाथ टागोर जयंती, **सोमवार दि. ११ :** राष्टीय तंत्रज्ञान दिन, **मंगळवार दि. १२ :** परिचारिका दिन, संत मुक्ताबाई पुण्यतिथी, **गुरुवार दि. १४ :** छ. संभाजीराजे जयंती, **शनिवार दि. १६ :** श्री शनैश्चर जयंती, दर्श भावुका अमावास्या, **रविवार दि. १७ :** अधिक ज्येष्ठ मासारंभ, **गुरुवार दि. २१ :** गुरुपुष्यामृत, दहशतवाद विरोधी दिन, **बुधवार दि. २७ :** बकरी ईद, **गुरुवार दि. २८ :** स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, **शनिवार दि. ३० :** गोवा राज्य दिन, **रविवार दि. ३१ :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - मे २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अपूर्वा --- | यजुर्वेदी | २०/६/९७ ५.३ | कौंडिण्य, वृश्चिक ज्येष्ठा, ४ थे आद्य | B.E. E. & T.C. | टीसीएस बेंगलोर | वा.प्रा. १०.५ लाख | रविंद्र कृष्णराव कुलकर्णी छ.संभाजी नगर. ९८२३१७३४१५ |
| २. | प्रगण्या --- | यजुर्वेदी | ९/१०/९९ ५.३ | भारद्वाज, कन्या हस्त, २ रे आद्य | M.Com. M.B.A. (Finance) | खाजगी नोकरी बडोदा | वा.प्रा. --- | नरेंद्र जोशी बडोदा (गुजरात) ९६६२५११५१९ |
| ३. | श्लोका --- | देशस्थ ऋ. | २८/४/९८ ५.३ | वसिष्ठ, वृषभ कृतिका, ३ रे अंत्य | B.E. | पुणे येथे | वा.प्रा. १५ लाख | श्रीमती स्वातीताई राजेंद्र जोशी, सोलापूर ८४२१८७५६४६ |
| ४. | प्रणोती --- | यजुर्वेदी | २/१/९८ ५.४ | चंद्रात्रे, कन्या चित्रा, २ रे मध्य | B.E. | पुणे येथे | वा.प्रा. ४ लाख | प्रफुल्ल प्रल्हाद चंद्रात्रे नाशिक ७०४०५५७४१२ |
| ५. | मानसी --- | यजुर्वेदी | ४/२/९९ ५.२ | कौशिक, सिंह उ.फाल्गुनी आद्य | B.E. E. & T.C. | पुणे येथे | वा.प्रा. --- | यशवंत रामचंद्र कुलकर्णी नाशिक ८४२१६०७१६५ |
| ६. | मिताली --- | कोकणस्थ | २७/४/९३ ५.३ | विष्णूवृद्ध, मिथुन आर्द्रा, ४ थे आद्य | B.Com. PGDBM in Finance | खाजगी शाळेत क्लार्क | वा.प्रा. --- | किरण देव पेण, रायगड ७०३८९२८८८० |
| ७. | माधुरी | देशस्थ ऋ. | २७/१२/९९ ५.५ | विश्वामित्र, सिंह पूर्वा, २ रे मध्य | B.S.L. LLB, LLM Criminal Law | पुणे येथे | वा.प्रा. --- | अनिलराव व्यंकटेश कुलकर्णी पुणे ९४२३४५७४०८ |
| ८. | भक्ती --- | कोकणस्थ | १७/५/९७ ५.८ | अत्री, सिंह उत्तरा, पहिले आद्य | PG Diploma | टॅलेंड गम (WFH) | वा.प्रा. ५ लाख | मकरंद आठवले नाशिक रोड ८६००४१४९५० |
| ९. | अंकिता --- | देशस्थ ऋ. | २०/१०/९९ ५.४ | जमदग्नी, कुंभ धनिष्ठा, चौथे मध्य | B.Com. C.A. कत्थक ६ परीक्षा | बेंगलोर येथे | वा.प्रा. १९ लाख | मनोज वामनराव कुलकर्णी बेंगलोर ९८६०१३०३२१ |
| १०. | गौरी --- | यजुर्वेदी | ३/११/९७ ५.० | उपमन्यू, वृश्चिक जेष्ठा, आद्य | M.D. Ayurved | व्यवसाय | वा.प्रा. --- | मिलींद नरहर जोशी नाशिक ८३०८०८९३२० |

**जान्हवी राम पुजारी (घाटे) (देशस्थ ऋ,)** A +ve
**जन्मतारीख :** १९/१/२००१ **उंची :** ५.६
**शिक्षण :** M.Com. कथ्थक मध्यमा पूर्ण
**पत्ता : श्री. राम पुजारी (घाटे)**
मु.पो.नरसोबावाडी, जि. कोल्हापूर.
मोबा. 9209040094, 9420075695
**अपेक्षा :** सांगली, सातारा, कोल्हापूर भागातील अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | वृश्चिक | अनुराधा | पहिले | मध्य | देव |

**मयुरा अतुल साने (कोकणस्थ)** B +ve
**जन्मतारीख :** २/५/१९९९ **उंची :** ५
**शिक्षण :** B.E. Production **नोकरी :** पुणे येथे
**वा. उत्पन्न :** ७,७०,०००/- **अपेक्षा :** अनुरूप
**पत्ता : श्री. अतुल वसंत साने**
शिवप्रसाद संकुल, संभाजीनगर, कोल्हापूर.
मोबा. 9422425235, 9890778567

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कपि | वृश्चिक | विशाखा | चौथे | अंत्य | राक्षस |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - मे २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वेश<br>--- | कऱ्हाडे | १५/९/८९<br>५.७ | अत्री, कुंभ<br>पू.भाद्र, ३ रे<br>आद्य, मनुष्य | M.C.A. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>७ लाख | चंद्रशेखर सप्रे<br>विजापूर रोड, कोल्हापूर<br>९५६१८९८८७२ |
| २. | प्रसन्न<br>--- | देशस्थ ऋ. | २४/९/९६<br>५.३ | विश्वामित्र, मकर<br>धनिष्ठा, २ रे<br>मध्य, राक्षस | B.E.<br>Mech. | टी.सी.एस.<br>पुणे येथे | वा.प्रा.<br>८ लाख | प्रकाश प्रल्हाद बिलूरकर<br>शिवाजी पेठ, कोल्हापूर<br>९९२११९०३६४ |
| ३. | चैतन्य<br>--- | कोकणस्थ | १२/५/९५<br>५.८ | अत्री, कन्या<br>हस्त, ४ थे<br>आद्य, देव | B.E.<br>Civil | स्वत:चा<br>व्यवसाय | वा.प्रा.<br>४.८० लाख | गजानन फडके<br>माधवनगर रोड, सांगली<br>८१४९२५३८२३ |
| ४. | प्रथमेश<br>--- | देशस्थ | २/५/९६<br>५.१० | भारद्वाज, तुळ<br>चित्रा, ४ थे<br>मध्य, राक्षस | M,A.<br>(Psycho<br>logy) | सोलापूर<br>येथे नोकरी | वा.प्रा.<br>२.५ लाख | दत्ता भालचंद्र कुलकर्णी<br>विजापूर रोड, कोल्हापूर.<br>९४२००९०६९२ |
| ५. | प्रणव<br>--- | देशस्थ | २३/७/९२<br>५.४ | भारद्वाज, मेष<br>अश्विनी, ३ रे<br>आद्य, देव | B.E. Auto<br>Graphic<br>Design | कोल्हापूर<br>येथे नोकरी | वा.प्रा.<br>४.६८ लाख | विवेक रामकृष्ण कर्नाटकी<br>कोल्हापूर<br>९९२२३१३४०९ |
| ६. | प्रथमेश<br>--- | देशस्थ | ८/१०/९३<br>५.६ | भारद्वाज, मिथुन<br>आर्द्रा, ३ रे<br>आद्य, मनुष्य | B.Com.<br>LLB, LLM<br>MBA | स्वत:चा<br>व्यवसाय<br>कोल्हापूर | वा.प्रा.<br>९-१० लाख | उदय वासुदेव राजोपाध्ये<br>राममंगल कार्यालयजवळ,<br>कोल्हापूर. ९४२२५८९८९६ |
| ७. | शशांक<br>--- | कोकणस्थ | २१/९/९१<br>५.८ | शांडिल्य, कुंभ<br>धनिष्ठा, ३ रे<br>मध्य, राक्षस | B.Com. | कोल्हापूर येथे<br>नोकरी | वा.प्रा.<br>३.२५ लाख | महेश बा. सहस्रबुद्धे<br>कसबा बावडा, कोल्हापूर<br>७५८८१८०५१८ |
| ८. | स्वरूप<br>O +ve | देशस्थ | ३/१/२०००<br>६.२ | वत्स, वृश्चिक<br>अनुराधा, २ रे<br>मध्य, देव | B.E.<br>Mech. | हिंजवडी पुणे<br>येथे नोकरी | वा.प्रा.<br>६ लाख | दिनकर विनायक पावशे<br>कसबा बावडा, कोल्हापूर<br>९४२१४००८३६ |
| ९. | नीरज<br>--- | देशस्थ | २/६/९४<br>५.८ | गौतम, कुंभ<br>पू.भाद्र, तिसरे<br>आद्य, मनुष्य | B.E.<br>Mech. | लोणेरे रायगड<br>येथे | वा.प्रा.<br>१२ लाख | प्रकाश पं. कुलकर्णी<br>टाकाळा, कोल्हापूर<br>८००७६७११९७ |
| १०. | कौशिक<br>O +ve | कोकणस्थ | ६/१/२०००<br>--- | कौशिक, धनू<br>पूर्वाषाढा, प्रथम<br>मध्य, मनुष्य | B.E.<br>Electrical | व्यवसाय | वा.प्रा.<br>६ लाख | मिलींद मधुकर खरे<br>विश्राम बाग, सांगली.<br>९८८११४३५२२ |

**डॉ. अनिरूद्ध श्रीकांत वैद्य (देशस्थ ऋ.) A +ve**

**जन्मतारीख :** ९/६/१९८८ **उंची :** ५.८ फूट

**शिक्षण :** M.B.B.S. DCH **वा.प्रा. :** 15 ते 20 लाख

**नोकरी /व्यवसाय :** उत्तराखंड येथे प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये (सौम्य मंगळ आहे) **अपेक्षा :** अनुरूप

**पत्ता : श्री. श्रीकांत वैद्य,** मुरारजी पेठ, सोलापूर.

मोबा. 9423590566, 9922437135

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अत्री | मीन | उ.भाद्रपदा | चौथे | मध्य | मनुष्य |

**सौरभ अमित गाडगीळ (कोकणस्थ) AB +ve**

**जन्मतारीख :** ८/११/१९९५ **उंची :** ५.४

**शिक्षण :** B.C.A., MBA **नोकरी :** IDFC First Bank

**वा. प्रा. :** 5 लाख (सांगली येथे)

**अपेक्षा :** मनमिळावू, अनुरूप

**पत्ता : श्री. अजित शामराव गाडगीळ**

जोशी गल्ली, गावभाग सांगली,

मोबा. 9552520494, 9011036426

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | मेष | कृतिका | प्रथम | अंत्य | राक्षस |

# ॥ अविट गोडीचे श्रीरामायण ॥

## स्वये श्रीरामप्रभु ऐकती

स्वये श्रीरामप्रभु ऐकती
कुश लव रामायण गाती

कुमार दोघे एक वयाचे
सजीव पुतळे रघुरायाचे
पुत्र सांगती चरित पित्याचे
ज्योतिनें तेजाची आरती

राजस मुद्रा, वेष मुनींचे
गंधर्वच ते तपोवनींचे
वाल्मीकींच्या भाव मनींचे
मानवी रुपें आकारती

ते प्रतिभेच्या आम्रवनांतिल
वसंत - वैभव - गाते कोकिल
बालस्वरांनी करुनी किलबिल
गायनें ऋतुराजा भारिती

फुलांपरी ते ओठ उमलती
सुगंधसे स्वर भुवनीं झुलती
कर्णभूषणें कुंडल डुलती
संगती वीणा झंकारिती

सात स्वरांच्या स्वर्गामधुनी
नऊ रसांच्या नऊ स्वर्धुनी
यज्ञ - मंडपीं आल्या उतरुनी
संगमी श्रोतेजन नाहती

पुरुषार्थाची चारी चौकट
त्यात पाहतां निजजीवनपट
प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट
प्रभुचे लोचन पाणावती

सामवेदसे बाळ बोलती
सर्गामागुन सर्ग चालती
सचीव, मुनिजन, स्त्रिया डोलती
आंसवें गाली ओघळती

सोडुनि आसन उठले राघव
उठुन कवळिती अपुले शैशव
पुत्रभेटिचा घडे महोत्सव
परी तो उभयां नच माहिती

अलौकिक प्रतिभेचे धनी, महाकवी, आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर. आणि ज्येष्ठ संगीतकार भावतीर्थ सुधीर फडके उर्फ बाबूजी यांनी ५६ गीतांमध्ये संपूर्ण रामायण गुंफले. ७० वर्षांपूर्वी आकाशवाणी वरून प्रसारित झालेला हा अमूल्य ठेवा महाराष्ट्राचा मानबिंदू ठरला आहे. यातील प्रथम गीत म्हणजे '**कुश लव रामायण गाती** !'

अयोध्येतील राजसभेत एक मोठा यज्ञ सुरु आहे, यावेळी वाल्मिकिंचे शिष्य असलेली कुश आणि लव नामक जुळी बालके प्रभू रामचंद्रांच्या समोर राजसभेत येऊन गीतांच्या माध्यमातून त्यांना रामचरित्र ऐकवत आहेत. इथे मोठे नाट्य घडते आहे. स्वतःच्या वडिलांसमोर दोन बालके त्यांचेच चरित्र ऐकवत आहेत, परंतु दोघांनाही आपल्या नात्याविषयी कल्पना नाही. या पहिल्या गीतात निवेदक सांगतोय की,

**स्वये श्रीराम प्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती**

या गीतात माडगूळकर लिहितात... 'ज्योतीने तेजाची आरती'. ज्योती म्हणजे लवकुश आणि तेज म्हणजे प्रभू रामचंद्र. माडगूळकरांनी लिहिलेल्या गीत रामायणातील कित्येक ओळी सुविचार झाल्या. त्यापैकीच ही एक. ते कुश लवांना तपोवनीचे गंधर्व म्हणतात, आणि हे गंधर्व वाल्मिकिंच्या मनोभावातील मानवी रूप आकारत आहेत. त्यांचे कोवळे स्वर म्हणजे म्हणजे जणु कोकिळेचेच सुस्वर आहेत आणि या गायनाने ऋतुराजा वसंत भारावून गेला आहे. त्यांच्या या गायनाचा प्रभाव राज सभेतील सर्व श्रोत्यांवर कसा होतो आहे, हे पुढे ते लिहितात... 'हे सात स्वर म्हणजे सप्त स्वर्ग आहेत आणि त्यातून नऊ रसांच्या नऊ स्वरांच्या नद्या वहात आहेत. त्याच्या धारा, यज्ञ मंडपातील सर्व श्रोत्यांना न्हाऊ घालीत आहेत. 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' प्रभू रामचंद्राना आपला जीवनपट पाहताना सर्वकाही आठवत आहे. त्या आठवणीने त्यांचे डोळे पाणावतात. एका मागोमाग एक असे सर्ग सुरूच राहतात. ते ऐकून सर्व श्रोते भारावले आहेत. अश्रू ओघळत आहेत. त्यांचे गायन समावेदाप्रमाणे आहे.

हे गायन ऐकून रामचंद्र आसनावरून उठतात. त्या मुलांना कवेत घेतात. पुत्र भेटीचा हा अलौकिक महोत्सव घडतो, परंतु त्यांना मात्र याची कल्पनाच नाहीये. अशा या गीत रामायणाच्या सर्व गीतांचे रसग्रहण मी करणार आहे. तुम्हाला हे नक्की आवडेल. आणि हे वाचून तुम्ही ही सर्व गीते पुन्हा ऐकाल अशी खात्री आहे.

**- सुधीर दाजी जोशी** , ९८२२२९८७२६

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.



- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

Quality Approvals
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




HEAD OFFICE : "SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA) Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

FACTORY : Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800 Fax. : +91 20 6647 1820

E-mail : info@shogini.com
Visit us at : www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.